


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ८१
www.ramprahar.com

बुधवार, ८ ऑक्टोबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


## अंतरंग


नवी मुंबई महापालिकेची अंतिम प्रभाग रचना जाहीर/२

कोयत्याचा धाक दाखवून लुटणारी टोळी गजाआड/५

साची बेलोसे रायगडची पहिली महिला स्टेट पॅनल पंच/८


# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे आज उद्घाटन | पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे बुधवारी (दि. ८) दुपारी ३ वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. मुंबई महानगर प्रदेशातील (एमएमआर) हे दुसरे विमानतळ असून यामुळे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरचा भार कमी होणार आहे. येत्या डिसेंबरपासून या विमानतळावरून उड्डाणांना सुरुवात होईल.

विमानतळ प्रांगणात होणाऱ्या उद्घाटन सोहळ्याला केंद्रीय नागरी उड्डयनमंत्री किंजरापु राममोहन नायडू, राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, कौशल्य, विकास, उद्योजकता व नावीन्यतामंत्री मंगलप्रभात लोढा यांच्यासह खासदार, आमदार, इतर नेतेगण उपस्थित राहणार आहेत. ११६० हेक्टर क्षेत्रफळ असलेले नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ जगातील सर्वात कार्यक्षम विमानतळांपैकी एक म्हणून डिझाइन केलेले आहे. या विमानतळावरून दरवर्षी ९०



दशलक्ष प्रवासी आणि ३.२५ दशलक्ष टन माल वाहून नेला जाईल. हे विमानतळ केवळ एमएमआरमधील प्रवासी आणि मालवाहतुकीची मागणी पूर्ण करण्यास मदत करेल असे नाही; तर मुंबई, नवी मुंबई आणि उर्वरित एमएमआरमधील लोकांसाठी प्रादेशिक आर्थिक वाढ, व्यवसायाच्या संधी, रोजगार आणि सुरळीत प्रवास अनुभवाला चालना देईल. दरम्यान, या विमानतळाला लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे नाव देण्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वपक्षीय कृती समितीसोबत झालेल्या बैठकीत शिक्कामोर्तब केले आहे. 'दिबां'च्या नावासाठी केंद्र सरकारही अनुकूल असल्याचे त्यांनी सांगितले आहे. आपल्या दौऱ्यात पंतप्रधान मोदी मुंबई मेट्रो-३चे लोकार्पण करणार आहेत. त्यानंतर 'मुंबई वन' या भारताच्या पहिल्या एकात्मिक मोबिलिटी ॲपचे उद्घाटन करणार आहेत तसेच अल्पकालीन रोजगारक्षम उपक्रमाचे उद्घाटन करतील. हा उपक्रम राज्यातील चारशे तंत्रनिकेतन महाविद्यालये तसेच दीडशे शासकीय तांत्रिक उच्च विद्यालयांमध्ये राबवला जाईल.

# अतिवृष्टीग्रस्तांसाठी ३१,६२८ कोटींचे पॅकेज

## महायुती सरकारची मोठी घोषणा; राज्यातील बळीराजाला दिलासा

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतीपिकांसह, घरे आणि जमिनींचेही अतोनात नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मंगळवारी (दि. ७) बळीराजाला मोठा दिलासा दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत शेतकऱ्यांसाठी तब्बल ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे मोठे मदत पॅकेज जाहीर केले आहे.



गेल्या अनेक दिवसांपासून अतिवृष्टीग्रस्त शेतकरी या पॅकेजच्या प्रतीक्षेत होते. विशेषत: मुख्यमंत्र्यांनी दिवाळीपूर्वीच मदतनिधी थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होईल, असे आश्वासन दिल्याने आजच्या मंत्रिमंडळ बैठकीकडे राज्याचे लक्ष लागले होते. दिवाळी सणाला आता काही दिवसच उरले असताना राज्य सरकारने मोठे मदतीचे पॅकेज जाहीर केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, राज्यात अतिवृष्टीमुळे ६८ लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर आता आम्ही ज्या ठिकाणी मदत करत आहोत, त्यामध्ये २९ जिल्हे, २५३ तालुके आणि २०५९ मंडळांचा समावेश आहे. कोरडवाहू शेतकऱ्यांना १८ हजार ५०० रुपये हेक्टरी, हंगामी बागायतदार शेतकऱ्यांना २७ हजार प्रति हेक्टरी, बागायती शेतकऱ्यांना ३२ हजार ५०० हेक्टर मदत दिली जाईल. ज्या शेतकऱ्यांनी विमा उतरवला आहे त्यांना १७ हजार प्रति हेक्टर मदत विम्यातून केली जाणार आहे. ज्या शेतकऱ्यांची जमीन अतिवृष्टीच्या पाण्यात वाहून गेली किंवा खरडून गेली आहे, त्यांना हेक्टरी ४७ हजार रुपयांची रोख नुकसानभरपाई आणि हेक्टरी तीन लाख रुपयांची मदत नरेगाच्या माध्यमातून देण्यात येईल. यामुळे जमीन खरडून गेलेल्या शेतकऱ्यांना मिळणारी एकूण मदत जवळपास हेक्टरी ३.४७ लाख रुपये इतकी असणार आहे.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, घरांची पडझड झाली, तिथे घरे उभारली जातील, ५० हजार रुपयांची मदत दुकानदारांना करणार आहोत. दुधाळ जनावरांसाठी ३७ हजार ५०० रुपये मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. तीन जनावरांची अट रद्द केली आहे. जेवढी जनावरे दगावली तेवढी मदत दिली जाईल. **(पान २ वर..)**

> **महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे शेतीचे, शेतकऱ्यांच्या घरांचे आणि इतर असे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अनेक ठिकाणी जमीनही खरडून गेली. त्यामुळे आता पुढच्या रब्बीची पिकेही त्या ठिकाणी घेता येणार नाहीत, परंतु शेतकरी पुन्हा आपल्या पायावर उभा राहिला पाहिजे, म्हणून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत कशी देता येईल यासाठी आम्ही हे पॅकेज देण्याचा निर्णय घेतला आहे.**
>
> **-देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री

## मराठा-कुणबी जीआरला अंतरिम स्थगितीस नकार

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई उच्च न्यायालयाने मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी आरक्षणाचा लाभ देणाऱ्या राज्य सरकारच्या शासन निर्णयाला (जीआर) अंतरिम स्थगिती देण्यास नकार दिला आहे. या निर्णयामुळे मराठा समाजाला दिलासा मिळाला असून कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सध्या सुरू राहणार आहे.

ओबीसी संघटनांनी शासनाच्या जीआरला विरोध करत उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या, मात्र मंगळवारी (दि. ७) न्यायालयाने त्यांची अंतरिम स्थगितीची मागणी फेटाळली. या सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी जीआरला तातडीने स्थगिती देण्याची मागणी केली. त्यांचा युक्तिवाद होता की, जर हा जीआर लागू राहिला, तर मोठ्या संख्येने कुणबी प्रमाणपत्रे वितरित होतील, ज्यामुळे शिक्षण आणि नोकरी क्षेत्रातील आरक्षणाचे चित्र बदलू शकते. यामुळे भविष्यात परिस्थिती पूर्ववत करणे अवघड होईल, असा त्यांचा दावा होता.

दुसरीकडे, राज्य सरकारच्या वकिलांनी आणि सरकारच्या निर्णयाचे समर्थन करणाऱ्या हस्तक्षेप अर्जांच्या वकिलांनी याला विरोध केला. त्यांनी सांगितले की, सरकार फक्त जुन्या नोंदींच्या आधारावर प्रमाणपत्रे देत आहे आणि यात नवीन आरक्षणाची निर्मिती होत नाही. ही प्रक्रिया मराठा समाजातील गरजू व्यक्तींना तात्काळ लाभ देण्यासाठी आहे. त्यामुळे याला स्थगिती देणे योग्य ठरणार नाही, असा युक्तिवाद त्यांनी केला. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकून घेतले आणि शेवटी अंतरिम स्थगिती देण्यास नकार दिला.

## निवडक

### चार नवीन रेल्वे प्रकल्पांना केंद्रीय कॅबिनेटची मंजुरी

**नवी दिल्ली :** भारतीय रेल्वेच्या पायाभूत सुविधांना बळकटी देण्यासाठी चार नव्या रेल्वे प्रकल्पांना मंगळवारी (दि.७) केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पांमुळे महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात आणि छत्तीसगड या चार राज्यांतील १८ जिल्ह्यांमध्ये रेल्वे नेटवर्कचा ८९४ किलोमीटरपर्यंत विस्तार होणार आहे.

### मनोरमा खेडकर यांना पोलिसांनी घेतले ताब्यात

**पुणे :** वादग्रस्त आणि निलंबित प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांची आई मनोरमा खेडकर यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. काही दिवसांपूर्वी नवी मुंबईतील ऐरोली येथून एका ट्रक क्लिनरचे अपहरण झाले होते. हा चालक खेडकर यांच्या पुण्यातील घरी आढळला होता. खेडकरांच्या कारला मिक्सर ट्रकची धडक बसल्याने चालकाचे अपहरण केल्याचा आरोप आहे.

## क्षुल्लक वादातून प्रवाशाची हत्या

### एक्सप्रेसमधून फेकला गेला; आरोपीला अटक



**नेरळ, कर्जत : प्रतिनिधी**

क्षुल्लक वादातून झटापटीदरम्यान एक तरुण धावत्या एक्सप्रेसच्या बाहेर फेकला गेल्याची घटना मंगळवारी (दि. ७) पहाटे सव्वा दोनच्या सुमारास मध्य रेल्वेच्या कर्जत-भिवपुरी स्थानकांदरम्यान घडली. यामध्ये त्या तरुणाचा मृत्यू झाला असून पोलिसांनी तत्काळ तपासचक्र फिरवत आरोपीला अटक केली आहे.

विनोद दरचंद कांबळे (वय २०, रा. वडगाव पुणे) असे मयत तरुणाचे असून तो आणि त्याचा मित्र गणेश शहाजी दिवेकर हे दोघे भुवनेश्वर-मुंबई कोणार्क एक्सप्रेसने हाजीअली दर्शनासाठी चालले होते. प्रवासादरम्यान दरवाजाजवळ बसण्याच्या वादातून विनोद आणि आरोपी मंगेश रामदास दसुरे (वय ३६, रा. अकोला) यांच्यात वाद झाला. या वेळी झटापटीमध्ये मंगेशने लाथ मारल्याने विनोद एक्सप्रेसच्या बाहेर फेकला गेला. गंभीर जखमी अवस्थेत विनोदला तातडीने कर्जत उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

दरम्यान, रेल्वे पोलिसांनी वेगाने कारवाई करत आरोपी मंगेश दसुरे याला ठाणे स्थानकावरून ताब्यात घेतले. आरोपीवर खूनासह विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

## तुकडाबंदी अधिनियम सुधारणा ते झोपडपट्टी पुनर्विकास!

### राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य मंत्रिमंडळाची बैठक मंगळवारी (दि. ७) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत राज्य सरकारने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. विशेष म्हणजे यात दोन मोठे निर्णय आहेत. तुकडाबंदी अधिनियमात सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली. त्याचप्रमाणे मुंबईत झोपडपट्टी पुनर्वसनासंदर्भात एसआरएमध्ये क्लस्टर योजना राबविण्यासाठी मंजुरी देण्यात आली आहे.

तुकडेबंदी अधिनियमात सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम १९४७मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. अधिनियमातील कलम ८ (ब)चे परंतुक वगळून कलम ९मध्ये पोट-कलम (३) नंतर परंतुक समाविष्ट करण्यात येणार आहे.

मुंबईत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए) अंतर्गत झोपडपट्टीच्या पुनर्विकासासाठी समूह पुनर्विकास योजना राबविण्यात येणार आहे. अमरावती महापालिकेला केंद्र शासन पुरस्कृत पीएम ई-बस योजनेंतर्गत ई-बस डेपो व चार्जिंग व्यवस्थेकरिता बडनेरा येथील दोन हेक्टर ३८ आर जमीन ३० वर्षासाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात अकोले येथे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालयाकरिता आवश्यक पदांना मान्यता देण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्याचे रत्ने व दागिने धोरण २०२५ जाहीर करण्यात आले आहे. सोने, चांदीचे दागिने,हिरे-रत्ने यांच्याशी निगडीत उद्योग-व्यवसाय वाढीस चालना मिळणार आहे. एक लाख कोटीं रुपयांची गुंतवणूक, पाच लाख नवीन रोजगार निर्मितेच उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. राज्यातील नागरी भागातील सांडपाण्यावरील प्रक्रियेच्या धोरणास मंजुरी देण्यात आली आहे. ४२४ स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये धोरण राबविण्यात येणार आहे.

स्वयंसेवी संस्थांद्वारे चालविण्यात येणाऱ्या विजाभज प्रवर्गाच्या खासगी अनुदानित प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक निवासी आश्रमशाळा, ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठीच्या निवासी आश्रमशाळा व विद्यानिकेतन आश्रमशाळांतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दोन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अशा ९८० आश्रमशाळातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लाभ मिळणार आहे.

## जंजिरा किल्ल्याजवळील जेट्टीचे काम अंतिम टप्प्यात

### पर्यटकांचा जलप्रवास होणार सुरक्षित

**मुरूड : रामप्रहर वृत्त**

मुरूडजवळील जंजिरा किल्ल्यात पर्यटकांना जाण्यासाठी उभारण्यात येत असलेल्या जेट्टीच्या कामाने आता वेग घेतला असून लवकरच हे काम पूर्ण होईल. त्यामुळे पर्यटकांचा जलप्रवास सुखकर आणि सुरक्षित होणार आहे.



जंजिरा किल्ला समुद्रात असल्याने या ठिकाणी जाण्यासाठी बोटीने जावे लागते. किल्ल्याच्या प्रवेशव्दारावर समुद्राच्या लाटांचा मारा कधी कधी जास्त होत असल्याने बोटचालकांना तेथे जाताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्याचबरोबर पर्यटकांनाही बोटीतून उतरताना कठीण होऊन बसते. या पार्श्वभूमीवर येथे अद्ययावत जेट्टी असावी अशी मागणी होऊ लागल्याने राज्य शासनाने सागरमाला योजनेंतर्गत ९३.५६ कोटी खर्चून जेट्टी उभारणीस सप्टेंबर २०२२मध्ये मान्यता दिली होती.

जंजिरा किल्ल्याच्या पुढील बाजूस प्रथम २५० मीटर लांबीची बॅकवॉटर वॉल बांधण्याचे काम सुरू झाले. मोठ्या दगडांनी किल्ल्याच्या मागील बाजूस समुद्रात भिंत बनवण्याचे नियोजन होते. त्यानुसार सिमेंटचे ब्लॉक लावून वॉल बसविण्याच्या कामाला सुरुवात झाली, पण हे काम धिम्या गतीने होत पर्यटक व स्थानिकांनी नाराजी दर्शवली होती. त्यानंतर या कामाला जोमाने सुरुवात होऊन काम अंतिम टप्प्यात आले आहे. लवकरच अद्ययावत जेट्टीचे काम पूर्ण होऊन पर्यटकांना किल्ल्यात जाणे सुकर होईल.

या संदर्भात मेरीटाईम बोर्डाचे उपअभियंता प्रवीण पाटील यांना विचारणा केली असता ते म्हणाले की, पावसामुळे काम बंद होते. आता पुन्हा कामाला सुरुवात झाली आहे. पुढील महिन्यात काम पूर्ण होईल आणि लवकरच जेट्टी पर्यटकांसाठी खुली होईल.

मुरूड परिसराला दरवर्षी लाखो पर्यटक भेट देत असतात. येथील जंजिरा किल्ला पर्यटकांचे प्रमुख आकर्षण आहे. या ठिकाणी विद्यार्थ्यांच्याही सहली येत असतात. त्यामुळे परिसर गजबजलेला असतो. पर्यटकांच्या माध्यमातून स्थानिकांना रोजगार उपलब्ध होतो.

## हिमाचल प्रदेशमध्ये भूस्खलनात १५ जणांचा मृत्यू

**बिलासपूर : वृत्तसंस्था**

हिमाचल प्रदेशमधील बिलासपूर येथे बल्लू पुलाजवळ झालेल्या भीषण भूस्खलनामुळे प्रवासी बस ढिगाऱ्याखाली दबली गेली. या दुर्घटनेत आतापर्यंत १५ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे, तर तीन व्यक्तींना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले आहे.

या दुर्घटनेनंतर तातडीने बचावकार्य सुरू करण्यात आले. स्थानिक प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन दल मलबा हटवून अडकलेल्या लोकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्याच्या कामात गुंतले आहेत. बसमध्ये नेमके किती प्रवासी होते याची अद्याप पुष्टी झालेली नाही. परिसरातील नागरिकदेखील मदत आणि बचावकार्यात सहकार्य करत आहेत. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार बचावकार्य रात्रभर सुरू राहील.

## स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानाला राज्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या काळात राबविण्यात आलेल्या स्वस्थ नारी, सशक्त परिवार या विशेष आरोग्य अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या अभियानांतर्गत एकूण २,३०,६५३ आरोग्य शिबिरे घेण्यात आली, ज्यामध्ये ३,४१३ विशेष शिबिरांचा समावेश होता. या शिबिरांमध्ये एक कोटी आठ लाख ५९ हजारांहून अधिक नागरिकांची तपासणी करण्यात आली. यात ३२ लाख ७१ हजार पुरुष आणि ७५ लाख ८७ हजार महिला




लाभार्थी ठरल्या.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सेवा हाच संकल्प, भारत हीच पहिली प्रेरणा... ७५ वर्षे' यानुसार राष्ट्रीय स्तरावर स्वस्थ नारी, सशक्त परिवार हे विशेष अभियान देशात राबविण्यात आले. महाराष्ट्रात आरोग्य विभागाच्या उत्कृष्ट नियोजनामुळे या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्त्रीशक्तीला आरोग्यशक्तीची साथ देण्यासाठी आणि महिला आरोग्य व सशक्तीकरणाला प्राधान्य देण्यासाठी हे अभियान राबविले गेले.

या अभियानांतर्गत महिला आणि बालकांच्या आरोग्य तपासणीसह विविध जनजागृती उपक्रम आणि आरोग्य शिबिरांचे आयोजन जिल्हा आणि महापालिका स्तरावर करण्यात आले. या शिबिरांमध्ये महिलांच्या असंसर्गजन्य आजार, उच्च रक्तदाब, मधुमेह, कर्करोग, क्षयरोग व रक्तदाब तपासणी, गर्भवती महिलांची तपासणी, बालकांचे लसीकरण, पोषण व मासिक पाळी स्वच्छतेबाबत मार्गदर्शन आणि समुपदेशन करण्यात आले. याशिवाय रक्तदान शिबिरे, नि-क्षय मित्र नोंदणी मोहीम, आयुष्मान कार्ड वितरण, प्रधानमंत्री मातृ वंदना कार्ड वितरण आणि अंगणवाडी केंद्रांमार्फत पोषण जनजागृती उपक्रम राबविण्यात आले.

अभियान यशस्वी व्हावे म्हणून सार्वजनिक आरोग्य विभागासोबत शिक्षण, महिला व बाल विकास, वैद्यकीय शिक्षण, ग्रामविकास व नगरविकास विभाग यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

# नवी मुंबई महापालिकेची अंतिम प्रभाग रचना जाहीर

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी शासन आणि निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार अंतिम प्रभाग रचना ६ ऑक्टोबर रोजी रात्री उशिरा जाहिर करण्यात आली आहे.

राजकीय पक्ष आणि हरकतीदारांच्या सूचनेनुसार पालिकेने काही बदल अंतिम प्रभाग रचनेत केल्याचे दिसत आहेत. एकुण १११ नगरसेवकांचे २८ प्रभाग निश्चित केले असून यंदाची निवडणुक चार सदस्यीय पध्दतीने होणार आहे. शहरातील गावठाणाचे प्रभाग सुरक्षित करण्यात आल्याचे दिसत आहे. तर १४ गावांसाठी एक प्रभाग असणार आहे. पालिकेतील काही माजी नगरसेवक व माजी नगरसेविका आणि इच्छुकांचा अंतिम प्रभाग रचनेनंतर हिरमोड झाल्याचे दिसत आहे. तर भारतीय जनता पार्टीने न्यायालयात धाव घेण्याचा इशारा दिला आहे. आता आरक्षण सोडत आणि निवडणूक कार्यक्रमाची प्रतीक्षा लागून राहिली आहे.



## अखेर नेरूळ गावाचे विभाजन झाले रद्द

***नवी मुंबई महापालिका निवडणुकीसाठीची अंतिम प्रभाग रचना हरकती सूचना सुनावणी झाल्यावर अखेर मंगळवारी जाहीर करण्यात आली. यात सर्वाधिक प्रश्न निर्माण झाला होता. नेरूळ गाव विभागल्याचा. सरळ रेष आखात पालिकेच्या अधिकाऱ्यांनी नेरूळ गावाची विभागणी करण्यात आली होती. यात तर अनेक घरे दुभागली होती. कोणताही ताळमेळ या विभागणीत दिसून येत नव्हता. नेरूळ गावातील प्रभाग रचनेवर हरकतीचा पाऊस पडला होता. अखेर नेरूळ गाव पुन्हा एकसंध राखत ही प्रभाग रचना बदलण्यात आली. त्यामुळे इच्छुकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.***

२२ ऑगस्ट २०२५ रोजी प्राथमिक अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतर त्यावर हरकती व सूचना घेण्यात आल्या होत्या. जवळपास २५०० हरकती यांवर आल्या होत्या. प्रारुप प्रभाग रचना अधिसूचनेवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा विचार करुन राज्य शासन नियुक्त प्राधिकृत अधिकारी , महाराष्ट्र शासन यांनी केलेल्या शिफारशीनुसार नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीसाठी राज्य निवडणूक आयोगडके पाठविण्यात आलेल्या अंतिम प्रभाग रचनेला रानिआ-मनपा-२०२५/प्र.क्र.११/का-५, ६ ऑक्टोबर २०२५ अन्वये मान्यता दिल्यानंतर नगरविकास विभागाचे नेमून दिलेल्या वेळापत्रकानुसार अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात आली आहे. अंतिम प्रभाग रचनेवर कोणतीही हरकत सूचना किंवा त्या अनुषंगाने सुनावणी नियामानुसार घेण्यात घेण्यार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. तर राज्य शासनाच्या अधिसूचनेनुसार, ही अंतिम प्रभागरचना आगामी सार्वत्रिक निवडणुकीत लागू राहणार आहे. पुढील निवडणुकीसाठी याच अधिसूचनेच्या आधारे प्रभागांचे आरक्षण आणि निवडणुकीची प्रक्रिया राज्य शासनाच्या निर्देशानुसार पार पडणार आहे.

नवी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत पुर्वी जाहीर करण्यात आलेल्या प्रभागापैकी १४ प्रभागांचे लोकसंख्येचे निकष बदलण्यात आले आहेत. त्यामुळे काही प्रभागांमध्ये सीमांकनात काही अंशी फेरफार झाली आहे. नवी मुंबई महापालिकेत पुन्हा नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या १४ गावांना यंदाच्या निवडणुकीत मतदानाची संधी देण्यात आली आहे. प्रभाग क्रमांक १४ हा १४ गावांसाठी ठेवण्यात आला आहे. यात अडवली, भूतवली, महापे पावणे या गावांचा देखील समावेश आहे. त्यामुळे १४ गावांतील मतदारांवर या प्रभागाचे भवितव्य अवलंबून असणार आहे.

# पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी ४४ लाखांची मदत

## नवी मुंबई माथाडी, मापाडी व्यापारीवर्गाकडून मुख्यमंत्र्यांना चेक सुपूर्द

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमधील (एपीएमसी) माथाडी कामगार व व्यापाऱ्यांनीही कंबर कसली होती. मार्केटनिहाय मदत संकलन केले जात होते. याबाबत सातत्याने आवाहन केले जात होते. ज्या शेतकऱ्यांच्या मेहनतीवर बाजारपेठ चालते. त्यांच्याप्रती कृतज्ञता बाळगून कामगार व व्यापारी वर्गाने तब्बल ४४ लाख रुपये गोळा करून तो धनादेश मुख्यमंत्री सहाय्यात निधीसाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे मंगळवारी सुपूर्द केला.




राज्याला पावसाने झोडपून काढल्याने मराठवाडा, सोलापूर जिल्यातील जनजीवन विस्कळीत झालेले दिसून आले. तर शेतीचे कधीही भरून न येणारे नुकसान झाल्याचे पाहून शेतकऱ्यांना अश्रू अनावर झाल्याचे दिसून आले. राज्यावर आलेल्या या नैसर्गिक आपत्तीला सामोरे जाण्यासाठी शासनाने कंबर कसली असली तरी शहरातील नागरिकांनीदेखील शेतकऱ्यांसाठी आपले हात सैल केल्याचे दिसून आले. प्रत्येकाने कोणत्या ना कोणत्या रूपात शेतकऱ्याला जमेल तशी मदत केली. त्यात देशातील सर्वात मोठी असलेली मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती देखील मागे राहिलेली नाही. ज्या शेतकऱ्यांच्या मेहनतीवर बाजारपेठ चालते. कामगार व्यापारी वर्ग टिकून आहे. त्यांनीदेखील मदतीचा हात पुढे केला. शेकडो टन अन्न धान्य शेतकऱ्यांना पुरवले गेले. तसेच मदतनिधीसाठी आवाहन करून मदत फेऱ्या करून तब्बल ४४ लाख रुपयांचा निधी जमा करण्यात आला.


यात फळ मार्केट २८ लाख, भाजीपाला मार्केट आठ लाख १० हजार, अन्न धान्य मार्केट पाच लाख कांदा बटाटा मार्केट तीन लाख असे एकूण ४४ लाख रुपयांचे चेक मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी देवेंद्र फडणवीसांकडे सुपूर्द करण्यात आले.

# वाहतूक नियम मोडणाऱ्यांवर म्हसळा पोलिसांची कारवाई

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा शहरांत दिवसभरांत एस.टी. प्रवासी वाहतुक सेवा एकदिशा मार्गाने म्हणजे म्हसळ्याकडून माणगाव, गोरेगाव मार्गाने सुरू असते त्याच वेळात खाजगी प्रवासी वाहतुक, रिक्षा, मिनीडोअर, मालवाहू टेंपो, ट्रॅक्टर आशी सर्व प्रकारच्या वाहनांची वाहतुक दोनही दिशेने सुरू असते. याच वेळी दुचाकी, तीनचाकी वाहतुकदार नियमांचे भंगकरीत वाहने चालवितात त्यांच्यावर रायगड वाहतुक पोलीस आणि म्हसळा पोलिसांनी शहरांत नाकाबंदी करून दंड लावण्याची कारवाई केली.

ट्रिपल शीट, सीट बेल्ट परिधान न करणे, वाहतुक परवाना नसलेले,अल्पवयीन मुलानी गाडी चालविणे, अशा विविध वाहतुक नियम प्रकरणी वाहतूक नियमांचे उल्लघंन करणाऱ्या एकूण ४० जणांवर कारवाई करून सुमारे ३० हजारांची चलन बजावल्याचे सांगण्यात आले. या कारवाईत रायगड वाहतुक शाखेच्या एपीआय मिरा लाड यांच्या समवेत, एपीआय संदीप कहाळे, हेडकाँस्टेबल बाबासाहेब बोंगाणे, ट्रॅफीक काँस्टेबल सूरज शेडगे, सुर्वे होते.




जर कदाचित काही चूक झालीच तर पोलिसांना ती व्यवस्थित समजून सांगा, त्यामुळे पोलीस तुम्हाला सोडू ही शकतील. नो पार्किंगमध्ये गाडी पार्क करणे, हेल्मेट नसताना गाडी चालवणे, मर्यादेपेक्षा जास्त वेगाने गाडी चालवणे, गाडीमध्ये धूम्रपान करणे, गाडीला नंबर प्लेट नसणे, लायसन्स नसताना गाडी चालवणे, गाडीचे RTO कडे रेजिस्ट्रेशन नसताना गाडी चालवणे, वैध इन्शुरन्स किंवा वैध पोलुशन अंडर कंट्रोल सर्टिफिकेट या सर्व गोष्टी भारतामध्ये गुन्हा ठरू शकतात, असे मिरा लाड यांनी सांगितले. या वेळी उपस्थित आसलेल्या महीलावर्ग आणि नागरिकानी कारवाईचे स्वागत करीत पोलिसांचे कौतुक केले.

# 'त्या' दोन मुलांना पोलिसांनी शोधले

**नवी मुंबई : बातमीदार**

उलवा शहरातील मोरावे गावात घडलेल्या एका धक्कादायक घटनेने परिसरात खळबळ उडवली आहे. दारूच्या नशेत वडिलांकडून आईवर झालेल्या मारहाणीमुळे दोन लहान मुले भीतीने घरातून पळून गेली होती. उलवा पोलिसांनी तातडीने कारवाई करत चार तासांच्या शोधमोहीमेनंतर दोन्ही मुलांना सुखरूप शोधून काढले. पोलिसांच्या कामगिरीचे सर्वच स्तरांतून कौतुक होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित व्यक्ती दारूच्या नशेत घरी परतल्यावर पत्नीशी वाद घालू लागला. वाद वाढत जाऊन त्याने पत्नीवर हात उचलला. हा प्रसंग पाहून त्यांची नऊ वर्षांची मुलगी आणि सहा वर्षांचा मुलगा घाबरून रडत घराबाहेर पळून गेले. आईने पतीच्या तावडीतून सुटका करत मुलांचा शोध घेण्यास सुरुवात केली. काही वेळ मुलांचा पत्ता न लागल्याने त्या मातेने घाबरून तातडीने शेजाऱ्यांच्या मदतीने उलवा पोलिस ठाण्यात धाव घेतली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक वरिष्ठ पोलीस निरीक्षक अर्जुन राजने, पोलीस व निरीक्षक अश्विनी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस शिपाई देवकर, पोलीस शिपाई सोनवणे पोलीस शिपाई, जांभोरे यांनी तत्काळ शोधमोहीम सुरू केली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. तसेच स्थानिक नागरिकांकडून माहिती घेण्यात आली.

अखेर चार तासांच्या अथक प्रयत्नांनंतर पोलिसांना ही दोन्ही मुले मोरावे गावच्या बाहेरील रस्त्यावर एका कोपऱ्यात घाबरून सुरक्षित अवस्थेत उभी असलेली आढळली. मुलांना पोलिसांनी सुरक्षितपणे ठाण्यात आणून वैद्यकीय तपासणी करून घेतली. त्यांना धीर देण्यात येऊन आईच्या ताब्यात सुपूर्द करण्यात आले.



# नाईक महाविद्यालयाची फणसाड अभयारण्यास भेट

**मुरुड : प्रतिनिधी**

वन्यजीव सप्ताहानिमित्त कोंकण उन्नती मित्रमंडळाचे, वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय, बॅरिस्टर ए. आर. अंतुले शैक्षणिक संकुल, मुरुड-जंजिरा व फणसाड वन्यजीव अभयारण्य यांच्या संयुक्त विद्यमाने फणसाड वन्यजीव अभयारण्यात विद्यार्थ्यांची शैक्षणिक क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली. या क्षेत्रभेटीत एकूण ६७ विद्यार्थी व ११ प्राध्यापक यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.



दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्यभर वन्यजीव सप्ताहाचे विविध उपक्रम राबवले जात असून, फणसाड वन्यजीव अभयारण्यातही या निमित्ताने अनेक जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमांत प्रत्यक्ष सहभाग घेऊन वन्यजीव संरक्षणाबाबत ज्ञान वाढविले. जंगलात भ्रमंतीदरम्यान विद्यार्थ्यांना वनस्पती, झाडे, फुलपाखरे, पक्षी, कीटक, सरीसृप, बुरशी इत्यादी जैवविविधतेच्या घटकांविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.

यातून वनसंवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि जैवविविधतेचे संवर्धन या विषयांवर विद्यार्थ्यांना उपयुक्त माहिती फणसाड वनविभागातील वनपरिक्षेत्र अधिकारी- नितीन ढगे आणि कर्मचारी यांनी केले. त्यात प्रदीप बागवे, सदानंद नाईक, आदेश पोकळ, भामरे आणि आरोटे या वनकर्मचार्यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच ग्रीन वर्क्स ट्रस्टचे आकाश म्हैसधुणे, शिवानी पुजारी आणि प्रा. प्रणव बागवे यांनी विद्यार्थ्यांना निसर्ग निरीक्षण व वन्यजीव अभ्यासाचे महत्त्व समजावून सांगितले.

या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य जनार्दन कांबळे यांचे प्रोत्साहन लाभले. तसेच एनएसएस प्रमुख डॉ. श्रीशैल बहिरगुडे, डॉ.गजानन मुनेश्वर, डॉ.नारायण बागुल, डॉ. सीमा नाहीद, प्रा. प्रणव बागवे, प्रा. सिद्धेश सतविडकर, प्रा. चिंतन पोतदार, प्रा. मुस्कान रज्जब, प्रा. रुफी हसवारे आणि प्रा. प्रवेश पाटील उपस्थित होते.

# एसटी कामगारांच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक -परिवहनमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) कामगारांच्या विविध मागण्या आहेत. त्या रास्त असून या मागण्या पूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करून सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटी कामगार संघटना सोबत मंत्रालयात आयोजित बैठकीत सांगितले.



बैठकीस एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, सहसचिव राजेंद्र होळकर, विविध संघटनांचे संदीप शिंदे, समीर मोरे, श्रीरंग बरगे, हनुमंत ताटे, प्रकाश निंबाळकर, मुकेश तिगोटे, प्रदीप धुरंधर यांच्यासह एसटी कामगार संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

परिवहनमंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, कामगारांचे महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व अन्य थकीत भत्ते, तसेच दिवाळी सण अग्रिम देण्याबाबत शासन सकारात्मक निर्णय घेईल. २०१८ पासून कर्मचाऱ्यांची उपरोक्त स्वरुपाची आर्थिक देणी प्रलंबित आहेत. त्यासाठी सुमारे ४४०० कोटी रुपये लागणार आहेत.

मंत्री सरनाईक म्हणाले, प्रत्येक वेळेस शासनाकडे निधी मागणी योग्य नाही, त्याकरता एसटीला आर्थिकदृष्ट्या समृद्ध करणे गरजेचे आहे. कार्यभार स्वीकारल्यापासून एसटी महामंडळाचे उत्पन्न वाढविण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. जाहिरातीच्या माध्यमातून वर्षाला सुमारे १०० कोटी रुपये, आधुनिक पार्सल सेवेच्या माध्यमातून वर्षाला १०० कोटी तसेच महामंडळाच्या बस आगारात असलेले पेट्रोल पंप सध्या केवळ महामंडळाच्या बसेस करिता इंधन पुरवठा करतात.

भविष्यात हे पेट्रोल पंप व्यावसायिक स्वरूपात सुरू करण्यात येत आहे. याद्वारे वर्षाला २०० ते २५० कोटी रुपये मिळतील. अशा प्रकारे वर्षाला ५००-६०० कोटी रुपयांची उत्पन्नात वाढ अपेक्षित आहे. याबरोबरच उत्पन्नाचा नवा स्त्रोत म्हणून एसटी महामंडळाचे स्वतःचे प्रवासी प विकसित करण्यात येत आहे, यामधूनही प आधारित टॅक्सी, रिक्षा व ई-बाईक सेवा पुरविण्यात येणार आहे.

पीपीपी तत्त्वावर एसटी महामंडळाच्या जागांचा विकास करण्यात येणार आहे. यामध्ये कामगारांना सदनिका व विश्रामगृह बांधण्याचे देखील प्रायोजन आहे. त्यातून कर्मचाऱ्यांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. सार्वजनिक-खासगी भागिदारीतून होणाऱ्या प्रकल्प विकासातून महामंडळाची स्थावर मालमत्ता विकसित होईलच त्याचबरोबर वर्षाला एक ते दीड हजार कोटी रुपये उत्पन्न देखील मिळणे अपेक्षित आहे.

पुढील वर्षी अखेरपर्यंत आठ हजार नवीन बसेस महामंडळाच्या ताफ्यात येणार आहेत. महामंडळाकडे एकूण १८ ते २० हजार बस संख्या करण्यात येणार आहे. यासाठी लागणाऱ्या कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया राबवण्याची परवानगी मागितले आहे. तथापि, ती मिळेपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात करार पद्धतीने कामगार भरती करण्यात येणार आहे. ही व्यवस्था वाढीव बसेसमधून प्रवाशांना सेवा देण्यासाठी करण्यात येईल. त्यामधून निश्चितच उत्पन्न वाढणार आहे, असेही परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलची पुणे एनडीए येथे क्षेत्रभेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल तर्फे पुणे येथील विविध ऐतिहासिक ठिकाणांवर दोन दिवसीय क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली होती.

या क्षेत्रभेटीमध्ये मराठा साम्राज्याचा ऐतिहासिक वारसा जपलेल्या शनिवार वाडा येथे पहिला दिवशी म्हणजे ४/१०/२०२५, शनिवारी भेट देण्यात आली. यानंतर महात्मा गांधी व कस्तुरबा गांधी यांनी दिवस व्यतित केलेल्या आगाखान राजवाडा येथे भेट देण्यात आली. देशप्रेम ऐतिहासिक वारसांची जपणूक या भावना यावेळी विद्यार्थ्यांच्या मनात जागरूक व्हाव्या या हेतूने या भेट झाल्या. यानंतर ५/१०/२०२५, रविवारी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (National Defence Academy) या संस्थेला भेट देण्यात आली येथे भारतीय लष्कर, नौदल, हवाई दलाचे कॅडेट (अधिकारी) प्रशिक्षण घेतात. येथे भारतीय शशस्त्र दलासाठी अधिकारी घडवण्यात येतात येथे विद्यार्थ्यांसाठी एक अविस्मरणीय अनुभव व पुढील शिक्षणासाठी ऊर्जा मिळाली.

येथील दिनक्रम कसा असतो, विद्यार्थी प्रशिक्षण कसे दिले जाते, येथे शिक्षण घेण्यासाठी काय तयारी करावी लागतें,याबद्दलची माहिती विद्यार्थ्यांना मिळाली. स्कूलचे ४५ विद्यार्थी यांच्या समवेत स्कूलचे शिक्षक हर्षल फडके, मनीषा मोरे व स्कूलच्या प्राचार्या मुक्ता खटावकर यामध्ये सहभागी झाले होते.



## पान १ वरुन

### अतिवृष्टीग्रस्तांसाठी ३१,६२८ कोटींचे पॅकेज

ज्या विहिरींमध्ये गाळ गेलाय, नुकसान झाले आहे तिथे विशेष बाब म्हणून ३० हजार रुपये प्रति विहीर भरपाई दिले जाणार आहे. पायाभूत सुविधांचे जिथे नुकसान झाले तिथे १० हजार कोटी मदत केली जाणार आहे तसेच ६१७५ कोटी रुपये नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना देणार आहोत. बियाणे आणि इतर कामांसाठी प्रति हेक्टर १० हजार रुपये शेतकऱ्यांना दिले जाईल.

मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, सर्व प्रकारची मदत आपण करत आहोत. हे पॅकेज केवळ शेतीसाठी नाही, तर नुकसानग्रस्त घरे, जमिनी आणि जनावरांच्या नुकसानीसाठीही आहे. जास्तीत जास्त भरपाईचा पैसा दिवाळीच्या आधी देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. याशिवाय विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कातही माफी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

एकूणच राज्य सरकारने जाहीर केलेले हे पॅकेज आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या पॅकेजपैकी एक आहे. या पॅकेजमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्याला तातडीची रोख मदत मिळेलच, त्याचबरोबर त्यांना पुन्हा उभे राहण्यासाठी आणि पुढील हंगामात शेती करण्यासाठी भरीव आर्थिक आधार मिळेल, अशी आशा आहे.

## ३ नोव्हेंबर रोजी नवी मुंबई महापालिका लोकशाही दिन

**नवी मुंबई :** महाराष्ट्र शासन निर्देशानुसार नवी मुंबई महानगरपालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते.

नोव्हेंबर महिन्याचा लोकशाही दिन ३ नोव्हेंबर २०२५ रोजी होणार असून अर्जदारांनी विहित नमुन्यात आपला अर्ज दोन प्रतींमध्ये १७ ऑक्टोबर २०२५ पर्यंत मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे नावे 'लोकशाही दिनाकरीता अर्ज' असे दर्शनी भागी ठळकपणे नमूद करुन सादर करावयाचा आहे.

## दुखवटा

### कुसुम ठाकूर



**उरण :** तालुक्यातील दिघोडे येथील सामाजिक कार्यकर्त्या कुसुम हसुराम ठाकूर (वय ८३) यांचे निधन झाले आहे. त्यांच्या मागे त्यांचे दोन मुलगे व एक सासुरवाशीण मुलगी सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. दिघोडे विभागातील सामाजिक, शैक्षणिक उपक्रमात आणि धार्मिक कार्यात नियमित सहभागी होणाऱ्या व माणुसकीचे नाते जपणाऱ्या कुसुम ठाकूर या सर्वांनाच परिचित होत्या. सांत्वनासाठी येतांना कोणत्याही प्रकारचा दुखावटा आणू नये, असे आवाहन त्यांचे चिरंजीव दिघोडे ग्रामपंचायतीचे सरपंच किर्तीनिधी यांनी केले आहे.

सिडको शहरांचे शिल्पकार | भारत सरकार | महाराष्ट्र शासन | Navi Mumbai International Airport

# नवे पर्व देशाच्या विकासाचे, महत्वाकांक्षांच्या परिपूर्तीचे

## उद्घाटन

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ

**महा-मुंबईसाठी अंदाजे ₹ १९,६५० कोटी खर्चाचे नवीन ग्रीनफील्ड विमानतळ**








शुभहस्ते

## नरेंद्र मोदी

प्रधानमंत्री

- दिनांक: बुधवार ०८ ऑक्टोबर २०२५
- दुपारी: ३:०० वा.
- स्थळ: नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प स्थळ, नवी मुंबई, महाराष्ट्र

- विकासाला गती: विमानतळ प्रकल्पामुळे उत्पन्न, रोजगार, रिअल इस्टेट आणि व्यवसाय संधींना नवीन गती मिळेल.
- बहुविध वाहतूक केंद्र: भारताचे पहिले परिपूर्ण मल्टिमोडल विमानतळ, ज्यामुळे लॉजिस्टिक्स, ई-कॉमर्स, आदरातिथ्य आणि पर्यटन क्षेत्राच्या विकासाला चालना मिळेल.
- प्रती वर्ष प्रवासी वाहतूक क्षमता - २० दशलक्ष (टप्पा-१) व ९० दशलक्ष (अंतिम टप्पा)
- प्रती वर्ष मालवाहतूक क्षमता - ०.८ दशलक्ष मेट्रिक टन (टप्पा-१) व ३.२५ दशलक्ष मेट्रिक टन (अंतिम टप्पा)
- महाराष्ट्रासह देशातील स्थानिक व प्रादेशिक सांस्कृतिक वारशाचा प्रभावी अनुभव प्रदान करण्याकरिता डिजिटल व भौतिक कला प्रदर्शन
- पारंपरिक भारतीय वास्तुकला आणि अत्याधुनिक स्थापत्याचा डौल व कार्यक्षमता यांचे अनोखे मिश्रण असणारी 'कमळ' प्रेरित प्रवासी टर्मिनल इमारतीची रचना
- दोन स्वतंत्र धावपट्ट्यांसह प्रत्येक धावपट्टीकरिता दोन समांतर टॅक्सी वे
- एकूण क्षेत्रफळ - ११६० हेक्टर
- द्रुतगती महामार्ग, मेट्रो, उपनगरीय रेल्वे, वॉटर टॅक्सी, इत्यादींद्वारे कनेक्टिव्हिटी लाभलेले देशातील पहिले बहुउद्देशीय विमानतळ
- भविष्यातील तंत्रज्ञानाचे एकात्मीकरण करून किरकोळ खरेदी, अन्न व पेय, ड्युटी फ्री खरेदी, सुलभ बॅग हाताळणी आणि लाउन्ज चेक-इन इत्यादीकरिता डिजिटल सेवांची सुलभ उपलब्धता




**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ**
**महा-मुंबईची उज्ज्वल भविष्याकडे नवी झेप**

देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री | एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री | अजित पवार, उपमुख्यमंत्री

DD NEWS डी. डी. न्यूज वर थेट प्रक्षेपण

क्रमांक : आरओसी-२०२५-२६/क्र.-५/सी २९८२ बी

## संपादकीय

# निसर्ग कोपला

यंदाच्या पावसाळ्यात उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि जम्मू काश्मीरला ढगफुटी आणि भूस्खलनाचा फटका पुन्हा पुन्हा बसला. त्यापाठोपाठ आता पश्चिम बंगालच्या दार्जिलिंग जिल्ह्यात आणि आसपासच्या परिसरात ढगफुटी, सततचा पाऊस आणि भूस्खलनाने मोठ्या प्रमाणात होत्याचे नव्हते करून टाकले आहे. हिमालयाच्या कुशीतील या संपूर्ण प्रदेशातील यंदाचा हा निसर्गाचा रूद्रावतार ही मानवनिर्मित पर्यावरणीय आपत्ती असल्याची भीती व्यक्त होते आहे.

**सततच्या पावसातून झालेल्या भूस्खलनामुळे आता पश्चिम बंगालचा दार्जिलिंग जिल्हा आणि नेपाळच्या पूर्व भागात भीषण परिस्थिती आहे. मोठा विनाश घडवणाऱ्या या भूस्खलनात दोन्हीकडचे मिळून जवळपास ८० जण मृत्यूमुखी पडले असून अद्याप कित्येक बेपत्ता असल्यामुळे मृतांची संख्या वाढू शकते. पर्यटनासाठी ख्यात असलेल्या दार्जिलिंग परिसरातील डोंगराळ भागात शेकडो पर्यटक अडकले असून आपत्ती व्यवस्थापन कर्मचाऱ्यांकडून युद्ध पातळीवर मदतकार्य सुरू आहे. गेल्या अनेक दशकांपासून हिमालयाच्या कुशीतील सर्व राज्यांमध्ये पर्यटनासाठी बेसुमारपणे जंगले नष्ट करण्यात आली आहेत. हॉटेलांची वाढती संख्या, पर्यटकांच्या वाहनांच्या गर्दीमुळे सततचे रस्तारुंदीकरण व या साऱ्यातून फोफावत चाललेले अनियोजित शहरीकरण याचा भयावह परिणाम म्हणजे हिमालयाच्या उतारावरचा हा प्रदेश पोखरला गेला आहे. पर्यटनावर स्थानिकांची उपजीविका अवलंबून आहे. त्यामुळे त्याला प्रोत्साहन देऊ नये असे कुणीच म्हणणार नाही. या प्रदेशातूनच सीमाभागाकडे रसद जात असल्यामुळे त्यादृष्टीनेही उत्तर आणि ईशान्य भारतात रस्त्यांचे जाळे विणायलाच हवे आहे, पण हे अवघे काम नियोजनपूर्वक व स्थानिक पर्यावरणाला विचारात घेऊनच व्हायला हवे. अन्यथा या वर्षी निसर्ग कोपल्याचे जे चित्र दिसते आहे, ते इथून पुढे आणखी विनाशकारी होत जाईल अशी भीती व्यक्त होते आहे. इथे नदी पात्रांजवळ, डोंगर पोखरून वाट्टेल तशी उभी राहिलेली अनेक हॉटेले यंदाच्या ढगफुटी आणि भूस्खलनात एक तर चिखलात गाडली गेली किंवा त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामुळे ती बंद ठेवणे भाग पडले आहे. पर्यटनातून मोठी कमाई होत असल्यामुळे सुखावलेली येथील स्थानिक जनता यंदाच्या या विनाशामुळे पूर्णपणे हबकून गेली आहे. हवामान बदलामुळे एका ठिकाणी कमी वेळात खूप जास्त पाऊस पडण्याच्या घटना वाढणार हे हवामान बदलविषयक तज्ज्ञांनी केलेले भाकित देशभरातच खरे ठरताना दिसते आहे. परंतु उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर आणि आता पश्चिम बंगालच्या दार्जिलिंग परिसरात ढगफुटींचे रौद्ररूप पाहायला मिळाले. हिमालयाच्या कुशीत वसलेल्या या प्रदेशांत त्यामुळे माणसे आणि घरेच नव्हे तर जमिनींचे तुकडेही वाहून गेले आहेत. या नैसर्गिक आपत्तीत प्रचंड संख्येने स्थानिक लोक विस्थापित झाले आहेत. डोंगर कापत, झाडांची कत्तल करत केलेला विकास येथील भौगोलिक संरचनेला अस्थिर करून गेला असावा की काय असा प्रश्न त्यामुळे विचारला जातो आहे. यंदा मोठ्या प्रमाणात येथील नद्या, ओढे, ओहोळ यांनी आपले मार्ग बदललेले दिसले व वाटेत येईल ते सारे चिखलाच्या रेट्यात गाडले गेले आहे. उत्तरेतील या राज्यांमध्ये पर्यटनासाठी जाताना पर्यटकांना पावसाळ्याचा संपूर्ण काळ यापुढे टाळावा लागेल की काय अशी भयावह परिस्थिती पर्यटकांनी येथे यंदा अनुभवली आहे. येथील पर्यावरणीय बदलांचा गांभीर्याने आढावा घेऊन स्थानिकांना वाचवण्यासाठी येत्या काळात सुरक्षेच्या काय उपाययोजना करता येतील याचा विचार आता करावा लागणार आहे.**

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उद्घाटनासाठी सज्ज

मुंबई महानगर प्रदेशाच्या (एमएमआर) मध्यभागी आणि आसपासच्या शहरी स्थानिक संस्थांशी उत्तम कनेक्टिव्हिटी असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे बुधवारी (दि.८) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. हे विमानतळ मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील गर्दी कमी करेल. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय हे विमानतळ केवळ मुंबई महानगर प्रदेशातील प्रवासी आणि मालवाहतुकीची मागणी पूर्ण करण्यास मदत करेल असे नाही तर मुंबई, नवी मुंबई आणि उर्वरित मुंबई महानगर प्रदेशातील लोकांसाठी प्रादेशिक आर्थिक वाढ, व्यवसायाच्या संधी, रोजगार आणि सुरळीत प्रवास अनुभवाला चालना देईल.



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सिडको आणि मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेड यांनी स्थापन केलेल्या विशेष कंपनी- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेड (एनएमआयएएल)द्वारे सार्वजनिक-खाजगी भागीदारी अंतर्गत विकसित केले जात आहे. या कंपनीमध्ये अदानी विमानतळ होल्डिंग्ज मुख्य प्रवर्तक आहे.

मुंबई महानगर प्रदेशासाठी दुसरे आंतरराष्ट्रीय विमानतळ म्हणून पहिल्या टप्प्यात १९,६४७ कोटी खर्चून बांधलेले नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई विमानतळावरील गर्दी कमी करण्यासाठी आणि मुंबईला जागतिक बहु-विमानतळ प्रणालींच्या श्रेणीत आणण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ सोबत काम करेल, ज्यामुळे वार्षिक १५० दशलक्षपर्यंत एकत्रित प्रवासी क्षमता असलेले विमान वाहतूक केंद्र तयार होईल आणि मुंबईला आर्थिक पॉवरहाऊसमध्ये रूपांतरित करेल.



रोजगार निर्मिती ही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची एक प्रमुख विशेषता आहे. या प्रकल्पामुळे बांधकामादरम्यान हजारो रोजगार निर्माण झाले आहेत, त्यामुळे लाखो प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार संधी निर्माण होतील, विशेषतः रायगड, ठाणे, कोकण आणि संपूर्ण महाराष्ट्रातील तरुणांना याचा फायदा होईल अशी अपेक्षा आहे.

### नवी मुंबई विमानतळाच्या प्रमुख कार्यक्षम क्षमता

केवळ ११६० हेक्टर क्षेत्रफळ असलेले हे विमानतळ जगातील सर्वात कार्यक्षम विमानतळांपैकी एक म्हणून डिझाइन केलेले आहे. या विमानतळावरून दरवर्षी ९० दशलक्ष प्रवासी आणि ३.२५ दशलक्ष टन माल वाहून नेले जाईल. पहिल्या टप्प्यातील सुविधा अनुक्रमे २० एमपीपीए आणि ०.५ दशलक्ष मेट्रिक टन माल वाहून नेण्याची क्षमता प्रदान करतात. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामध्ये दरवर्षी ३.२५ दशलक्ष मेट्रिक टनांपेक्षा जास्त माल वाहून नेण्याची क्षमता असलेली जागतिक दर्जाची हवाई माल वाहून नेण्याची सुविधादेखील समाविष्ट आहे. पायाभूत सुविधांमध्ये ३,७०० मीटर लांबीचे दोन समांतर कोड-४एफ धावपट्ट्या आहेत, ज्यांना वाढीव कार्यक्षमतेसाठी दुहेरी समांतर टॅक्सीवे आणि जलद एक्झिट टॅक्सीवेद्वारे जोडले गेले आहे, पहिल्या टप्प्यात दक्षिण रनवे कार्यान्वित होत आहे.

### भारतातील पहिले खऱ्या अर्थाने बहु-मॉडेल विमानतळ

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ राष्ट्रीय महामार्ग, मुख्य शहरी रस्ते, उपनगरीय रेल्वे, मेट्रो आणि अगदी भविष्यासाठी तयार जल वाहतुकद्वारे अखंडपणे जोडलेले आहे. हे विमानतळ जल वाहतुकद्वारे जोडलेले पहिले विमानतळ असेल. हे विमानतळ मुंबई महानगर प्रदेशा च्या प्रत्येक कोपऱ्याशी जोडण्यासाठी एक अखंड मल्टी-मॉडल ट्रान्सपोर्ट नेटवर्क विकसित केले जात आहे. अटल सेतू सारखे महत्त्वाचे प्रकल्प ,उलवे कोस्टल रोड आणि प्रस्तावित ठाणे-नवी मुंबई विमानतळ उन्नत मार्ग जलद, सिग्नलमुक्त रस्ते कनेक्टिव्हिटी प्रदान करतील, तर मेट्रो लाईन ८, २०३१ पर्यंत नवी मुंबई मेट्रो विस्तारांच्या मदतीने नवी मुंबई आणि मुंबई विमानतळाला आणि मुंबईशी थेट जोडेल. उपनगरीय रेल्वे तारघर आणि खांदेश्वर स्थानकांद्वारे सुनिश्चित केली जाईल. याव्यतिरिक्त, प्रस्तावित मुंबई-हैदराबाद हाय स्पीड रेल कॉरिडॉर विमानतळाच्या पूर्वेकडील परिघातून जाईल, ज्यामध्ये देशाच्या विविध प्रदेशांमध्ये आणि तेथून हाय-स्पीड प्रवेश सुनिश्चित करण्यासाठी एक भूमिगत स्टेशनची योजना आहे, ज्यामुळे प्रादेशिक कनेक्टिव्हिटी आणखी मजबूत होईल.

### नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची अद्वितीय वैशिष्ट्ये

ऑटोमेटेड पीपल मूव्हर (एपीएम) प्रणाली, सुरळीत आंतर-टर्मिनल हस्तांतरणासाठी चारही प्रवासी टर्मिनल्सना जोडण्याची योजना आखली आहे तसेच शहराच्या बाजूच्या पायाभूत सुविधांना जोडणारा लँडसाइड एपीएमदेखील आहे. विमानतळावर शाश्वत विमान इंधनासाठी समर्पित साठवणूक, अंदाजे ४७ मेगावॅट सौर ऊर्जा निर्मिती आणि शहरातील सार्वजनिक कनेक्टिव्हिटीसाठी ईव्ही बससेवा असतील.

हे विमानतळ क्युरेटेड डिजिटल आणि भौतिक कला प्रतिष्ठानांद्वारे महाराष्ट्र आणि भारताच्या सांस्कृतिक परंपरेचे प्रदर्शनदेखील करेल, तर अनुकूल, भविष्यासाठी तयार तंत्रज्ञानाचा अवलंब केल्याने डिजिटल रिटेल, ड्युटी-फ्री शॉपिंग, बॅगेज हँडलिंग आणि लाउंज चेक-इनमध्ये अखंड प्रवेश सुनिश्चित होईल.

पहिल्या टप्प्यात नवी मुंबई विमानतळ,२९ कॉन्टॅक्ट एअरक्राफ्ट स्टँड, १३ रिमोट कमर्शियल स्टँड, सात कार्गो स्टँड आणि ३८ जनरल एव्हिएशन (जीए) स्टँडसह काम करेल ज्यावर १५ जीए हँगर्स असतील तसेच १,५०० कार, २० बस आणि २० ट्रकसाठी पार्किंग सुविधा असतील. अतिमत्त्वाची व्यक्ती आणि खासगी विमान वाहतुकीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अंतिम टप्प्यात जवळजवळ १०० जीए विमान स्टँड असलेले एक पूर्ण विकसित जीए टर्मिनल बांधण्याची योजना आहे.

### नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची संचालन तयारी

नागरी विमान वाहतूक महासंचालकांनी ३० सप्टेंबर २०२५ रोजी एनएमआयएला एअरोड्रोम परवाना मंजूर केला आहे, जो ऑपरेशन्स सुरू होण्यापूर्वीचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. डिसेंबर २०२५मध्ये देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय उड्डाण ऑपरेशन्स सुरू होण्याची अपेक्षा असल्याने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ भारताच्या प्रगती, आधुनिकता आणि भविष्यासाठी तयार असलेल्या विमान वाहतूक वाढीचे प्रतीक म्हणून हवाई प्रवास आणि पायाभूत सुविधांच्या मानकांची पुनर्परिभाषा करण्यास सज्ज आहे. २०४७पर्यंत विकसित भारताकडे देशाच्या वाटचालीला बळकटी देण्याच्या दिशेने आपण आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे.

**-सिडको जनसंपर्क विभाग**

## बदलते तंत्रज्ञान

### बीएसएनएलची ५जी सेवाही लवकरच होणार सुरू

सरकारी दूरसंचार कंपनी बीएसएनएल आपल्या ग्राहकांना लवकरच मोठे सरप्राईज देणार आहे. केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी पुष्टी केली की, बीएसएनएलचे सर्व ४जी टॉवर पुढील सहा ते आट महिन्यांत ५जीमध्ये अपग्रेड केले जातील. यानंतर बीएसएनएल युजर्सनाही जिओ, एअरटेल आणि व्हीआय प्रमाणेच सुपरफास्ट इंटरनेट कनेक्टिव्हिटीचा आनंद मिळणार आहे.




अलीकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बीएसएनएलच्या ४जी सेवांचा शुभारंभ केला होता. या अंतर्गत कंपनीने एक लाख नवीन ४जी मोबाइल टॉवर एकाच वेळी सुरू केले, ज्यामुळे देशभरात बीएसएनएलची ४जी सेवा कार्यान्वित झाली. कंपनी आणखी एक लाख टॉवर उभारण्याची तयारी करत आहे. यासोबतच ५जी सेवांचा सॉफ्ट लॉन्च या वर्षाच्या अखेरीस, म्हणजे डिसेंबरपर्यंत दिल्ली आणि मुंबईत होण्याची शक्यता आहे.

केंद्रीय मंत्री सिंधिया यांनी एका परिषदेत सांगितले की, भारतातील ४जी सेवा पूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित आहे. बीएसएनएलचा ४जी नेटवर्क उ-ऊजढ, तेजस नेटवर्क्स आणि टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस यांच्या संयुक्त प्रयत्नांनी विकसित करण्यात आले आहे. या कामगिरीमुळे भारत जगातील त्या पाच देशांपैकी एक बनला आहे, ज्यांनी पूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित दूरसंचार नेटवर्क विकसित केले आहे.

सिंधिया यांनी सांगितले की, बीएसएनएलसाठी हा प्रकल्प सोप्पा नव्हता. स्वदेशी ४जीस्टॅक तयार करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले, पण केवळ २२ महिन्यांत ढउड मध्ये कोर सॉफ्टवेअर, रेडिओ ॲक्सेस नेटवर्क आणि भारतीय सिस्टम इंटिग्रेटर तयार करण्यात यश आले.


सध्या देशभरात ९२,५६४ स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित बीएसएनएल मोबाइल टॉवर कार्यान्वित झाले आहेत. भारत जगातील सर्वात वेगाने ५जी सेवा सुरू करणारा देश ठरला आहे, आणि आता ९९.८% जिल्ह्यांमध्ये ५जी सेवा पोहचली आहे. बीएसएनएलचे ५जी नेटवर्क आत्मनिर्भर भारत या मोहिमेतील एक नवे पर्व ठरणार आहे. कंपनीचे विद्यमान ४जी नेटवर्क पूर्णपणे ५जी रेडी असल्याने लॉन्चसाठी फार वेळ लागणार नाही.

# स्वातंत्र्यसैनिक गोदावरी परुळेकर

गोदावरी शामराव परुळेकर यांचा स्मृतीदिन आहे. त्यांचा जन्म १४ ऑगस्ट १९०८ रोजी झाला. या भारतीय स्वातंत्र्यसैनिक, लेखिका होत्या.

प्रसिद्ध वकील असलेल्या वडिलांनी आपल्या या लेकीला वैचारिक स्वातंत्र्य दिले तसेच कृती करण्यासाठी पाठबळही पुरवले. त्यांच्या घरात आधुनिक वातावरण होते. बीएएलएलबी झालेल्या गोदावरीबाई कामगार चळवळीत सामील झाल्या. याच काळात साम्यवादी कार्यकर्ते शामराव परुळेकर यांच्याशी त्या विवाहबद्ध झाल्या. त्यानंतर त्यांना कामगारांच्या विविध प्रश्नांची माहिती झाली. दुसर्या महायुद्धाच्या काळात त्यांना वरचेवर तुरुंगवासात दिवस काढावे लागले. युद्ध संपल्यानंतर त्या वारली शेतकर्यांशी जोडल्या गेल्या. त्या शेतकर्यांची वेठबिगारीत दखल घेतली जात नव्हती आणि समाजात त्यांना प्रतिष्ठाही नव्हती. त्यांची सामाजिक उन्नती व्हावी यासाठी वारली शेतकर्यांच्या संघर्षाचा त्या एक भाग बनल्या.

१९१२मध्ये ना.म. जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली गोदावरी परुळेकर यांनी मानद साहाय्यक सचिव म्हणून कामगारांच्या शिक्षणप्रसाराच्या कामात मोलाची भूमिका पार पाडली. गिरगावपासून परळपर्यंतच्या भागात ठिकठिकाणी नागरिकांना वर्तमानपत्रे वाचण्यासाठी केंद्रे सुरू केली. त्यामुळे



**निमित्त**


लोकांमध्ये वाचनाची आवड निर्माण झाली व त्यांना शिक्षणाची गरज वाटू लागली. याच सुमारास १९१७ मध्ये चिंचपोकळी येथे वाचनालय सुरू केले. त्यावेळी त्यांची ११ मोफत ग्रंथालये व १० मोफत वाचनालये मोफत चालू होती. १९४५च्या सुमारास महाराष्ट्र प्रांतिक सभेच्या कामानिमित्त परुळेकर दांपत्य ठाणे जिल्ह्यातील आदिवासी वस्तीच्या डहाणू, तलासरी गावात फिरत असताना तेथील आदिवासींचे गुलामगिरीचे भीषण जीवन पाहून तेथेच काम करायचे त्यांनी ठरवले.

त्यांच्याबरोबर काम करताना त्यांच्या शोषणाविरुद्ध सावकार, जमीनदारांविरुद्ध संघर्ष उभारताना आलेले अनुभव या लढ्याची कहाणी, 'जेव्हा माणूस जागा होतो' या पुस्तकात गोदावरीबाईंनी चित्रबद्ध केली. 'जेव्हा माणूस जागा होतो' या समाजशास्त्रीय ग्रंथातून त्यांनी जमीनदारांकडे पिढ्यानपिढ्या वेठबिगारीने काम करणार्या आदिवासी स्त्री पुरुषांचे केलेले भयानक चित्रण अंगावर शहारे आणणारे आहे. आदिवासी समाजाला आपल्या हक्काची जाणीव करून दिल्यावर, माणूस कसा जागा झाला यावर हा ग्रंथ बेतलेला आहे. यातील 'वेठबिगारी गाडून टाकली' या प्रकरणातून आदिवासींच्या कोंडलेल्या भावना जागृत होऊन त्यांच्यात नवचैतन्य कसे निर्माण झाले याचे वर्णन केले आहे.

गोदावरीताईंनी वारली समाजातील स्त्रियांवर होणारे अत्याचार पहिले. स्त्रियांवरील या अत्याचाराविरुद्ध लढण्याचा निर्णय गोदावरीताईंनी घेतला, परंतु स्त्रियांमध्ये बदल घडवून आणण्याच्या कामात त्यांना अपेक्षेप्रमाणे यश मिळाले नाही. कारण त्यांच्या लक्षात आले की, वारली आदिवासींच्या कल्पना, आदर्श कृती यामध्ये सुधारणा घडवून आणण्यास शिक्षणाशिवाय अन्य पर्याय नाही. तेव्हा त्यांच्या शिक्षणासाठीच काम करण्याचा निर्णय घेतला. त्याचबरोबर सामाजिक आणि आर्थिक न्यायासाठी त्यांना लढण्याचे बळही गोदावरीताईंनी दिले. त्यासाठी राजकारणाचे प्राथमिक धडेही त्यांनी शिकवले. गोदावरीताईंनी ८ ऑक्टोबर १९९६ रोजी या जगाचा निरोप घेतला.

**(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### पाइल्सच्या त्रासावर वेदना कमी करणारा उपाय

मूळव्याध म्हणजेच पाइल्स ही एक गंभीर आणि असह्य वेदना देणारी समस्या आहे. जी आपल्या काही चुकांमुळे होते. हे नाजूक जागेचं दुखणं इतकं वाईट असतं की, ना नीट बसता येत ना उभं राहता येत. पाइल्स झाल्यावर टॉयलेट करताना भयानक वेदना होतात, विष्ठेतून रक्त येतं. गुदद्वारात सूज येत, फोड येतात. ज्यामुळे संडास करताना खूप वेदना होतात. या सूजेचं कारण म्हणजे जास्त वेळ एकाच जागी बूसन राहणं, पोट साफ न होणं, जास्त ताण देणं, गर्भधारणा किंवा पेल्विक भागावर वाढलेला दाब. पाइल्स झाल्यावर वेदना इतक्या वाढतात की, त्या कमी करण्यासाठी लोक वेगवेगळे उपाय शोधत असतात. अशात आज आपण असाच एक उपाय घेऊन आलो आहोत.



नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ हेल्थ (एनएचआय)च्या आकडेवारीनुसार अमेरिकेत पाइल्स हा चौथा सर्वात सामान्य गॅस्ट्रोइंटेस्टाइनल आजार आहे. दरवर्षी साधारण ३.३ दशलक्ष लोक यामुळे त्रस्त असतात. भारतातही ही समस्या खूप सामान्य आहे. अंदाजे ५०% लोकांना आयुष्यात कधी ना कधी पाइल्स होऊ शकतो.

पाइल्स होण्याची मुख्य कारणे सतत पोट बिघडणे, एकाच स्थितीत जास्त वेळ बसणे, जास्त वेळ उभे राहणे, लठ्ठपणा, अधिक मद्यसेवन, नैसर्गिक विधीसाठी जोर लावावा लागणे, फायबरची कमतरता, अनुवंशिक अशी अनेक आहेत.

जर पाइल्समुळे वेदना वाढल्या असतील आणि काहीतरी लगेच आराम देणारा उपाय हवा असेल, तर स्टॅनफोर्ड आणि यूएसएलएममध्ये प्रशिक्षित गॅस्ट्रोएंटेरोलॉजिस्ट डॉ. वेंडी यांनी सांगितलेला पाच मिनिटांचा उपाय खूप लोकप्रिय झाला आहे.

डॉ. वेंडी सांगतात की, जेव्हा गुदद्वारात सूज येते, तेव्हा पाय पाच मिनिटांसाठी वर उचलून ठेवणं हा एक इन्स्टन्ट आणि सोपा उपाय आहे. यासाठी त्यांनी एक व्हिडीओ शेअर केला आहे. ज्यात आपण उपाय बघू शकता.

डॉ. वेंडी सांगतात की, कंबर आणि पाय वर केल्यानं गुदद्वारातील नसांवरील दाब कमी होतो आणि रक्तप्रवाह गुरुत्वाकर्षणाच्या मदतीने हृदयाकडे परत जातो. यामुळे गुदभागातील ताण आणि सूज कमी होते आणि काही मिनिटांतच वेदनांपासून आराम मिळतो.

# कोयत्याचा धाक दाखवून लुटणारी टोळी गजाआड

## खालापूर पोलिसांनी आवळल्या मुसक्या




**चौक : प्रतिनिधी**

द्रुतगती मार्गावर असलेल्या जुन्या टॉयलेट येथे २९ सप्टेंबर रोजी पहाटेच्या वेळेस नैसर्गिक विधी करण्यास थांबलेल्या प्रवाशाला कोयत्याचा धाक दाखवून लुटमार करून पळून गेलेल्या आरोपींच्या मुसक्या खालापूर पोलिसांनी आवळल्या आहेत.

जुना टॉयलेट म्हणजे रॉबरी पॉईंट येथे ही घटना घडली. मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवे रॉबरी पॉईन्ट येथे कोयत्याचा धाक दाखवून मारहाण करून त्यांचेकडील रोख रक्कम चोरून नेली. लुटमार करणारे ओळखी व्यक्ती हायवे लगतच्या झाडी झुडपा पळुन गेलेले आहेत, अशी खबर मिळताच खालापूर पोलीस त्या ठिकाणी पोहचले. मारहाण झालेल्या इसमांची चौकशी करत असताना, हायवेच्या पुणे लेन बाजुला मुंबईच्या दिशेला २०० मीटर अंतरावर काही व्यक्ती लपुन बसलेले दिसत आहेत असे समजल्यावर पो. उप.नि.जगताप यांनी बॅटरी च्या उजेडात शोध मोहीम सुरू केली असता त्यांना पाच इसम शेतामधुन जाताना दिसले. त्यांना पाहताच पोलीस एका झोपडीच्या ठिकाणी दबा धरून बसले. थोडयाच वेळात शेतातुन चालत येणाऱ्या पाच व्यक्तींनी पोलिसांना पाहिल्याने ते पळु लागले तेंव्हा पोलिसांनी त्यांचा पाठलाग करून एकास पकडले व त्यातील चौघे अंधाराचा फायदा घेवुन पळून गेले.

पकडलेला आरोपी अनिल अशोक पवार (वय २५ वर्षे, रा. शिरवली आ.वाडी, ता. खालापूर) असे सांगुन सदरचा गुन्हा त्यांनी व त्याचे इतर चार साथीदार यांनी केल्याचे कबुल केले. मंगेश भाऊ पवार (रा. निबोडे दांडवाडी, खालापूर), किशोर विठठल पवार (रा. शिरवलीवाडी, खालापूर), संतोष हिलम (रा. विनेगांव, खालापूर), किशोर अशोक हिलम (रा. सावरोली, खालापूर)ही साथीदारांची नावे सांगितली.

यांतील अटक आरोपी अनिल अशोक पवार हा सध्या पोलीस अटकेमध्ये असुन त्यांस पोलीस कोठडी मिळालेली आहे. आरोपीत किशोर विठ्ठल पवार व गुरूनाथ उर्फ किशोर अशोक पवार हे पोलीस अटकेमध्ये असुन त्यांनीही पोलीस कोठडी मिळालेली आहे. इतर आरोपींचा शोध घेत आहोत. गुन्हयातील मालांपैकी आरोपी कडून १५००० रूपये माल हस्तगत करण्यात आलेला आहे.

आपल्या ताब्यातील वाहन मुंबई पुणे एक्सप्रेस ने प्रवास करताना कायदेशीर थांब्यावरच वाहने थांबवावित. थांबा नसलेल्या ठिकाणी ट्रक, टेम्पो, ट्रेलर इत्यादी वाहन चालकानी वाहन पार्किंग करू नये. तसेच मुंबई पुणे एक्सप्रेस रोडच्या बाजुस झाडीझुडपात संशयीत व्यक्ती लपुन बसलेले दिसल्यास आपल्या बरोबर असा कोणताही प्रसंग झाल्यास तात्काळ ११२ या क्रमाकावर फोन द्वारे पोलीसांना कळवावे. खालापूर पोलीस ठाणे ०२१९२-२७५०३३ पो.उप.नि. जगताप ९३२५१३३९२९ असे आवाहन करण्यात आले आहे. पोलीस अधिक्षक आंचल दलाल यांनी कठोर पावले उचलली आहेत.

# कर्जत-कल्याण राज्य मार्गावर तीन वाहनांचा विचित्र अपघात

**नेरळ : प्रतिनिधी**


पीकअप टेम्पोचालक वाहनासह फरार

कर्जत कल्याण राज्य मार्गावर तीन वाहनांचा विचित्र अपघात घडला आहे. यामध्ये दोन वाहनांचे मोठे नुकसाप झाले असून सुरुवातीला धडक देणारा पिकअप टेम्पोचालक वाहन घेऊन फरार झाला आहे. या अपघातात कुठलीही जीवित हानी झाली नाही, मात्र काही काळ रस्त्यावर दोन वाहन चालकांच्यामध्ये वाहन भरपाई वरून वाद सुरू असताना स्थानिकांनी केलेली मध्यस्थी यावरून हा वाद कर्जत पोलीस ठाण्यात तक्रारीपर्यंत जाऊन पोहचला.

मंगळावर ७ ऑक्टोबर दुपारी साडे बारा वाजण्याच्या सुमारस कर्जत कल्याण राज्य मार्गावरील सावरोली या परिसरात कर्जत कडून उल्हास नगर येथे निघालेली हुंडाई कंपनीची कार घेऊन निघालेले चालक नवनाथ शृंगीं यांना समोरून येणाऱ्या पिकअप टॅम्पो चालकाने किरकोळ धडक दिल्याने कार चालकाचे नियंत्रण सुटले आणि कार समोरून येणाऱ्या व्हॅगनार कारवर धडकली. यामध्ये पीकअप टेम्पो चालक आपले वाहन कर्जत दिशेने पळून गेला, मात्र या वेळी व्हॅगनार कारमध्ये आपल्या मुलाला शाळेत घेऊन जाणाऱ्या भिवपुरी येथील विलास धर्मा उघडे यांच्या कारचे नाहक नुकसान झाल्याने कारचे भरपाई म्हणून नवनाथ शृंगीं यांच्याकडे मागणी होत असल्याने शृंगी आणि त्यांची पत्नी घाबरून गेल्या होत्या. मोठ्या भीषण अपघातात सर्व वाचले होते.

दरम्यान, वाहनाची काच फुटून डोक्याला लागलेल्या नवनाथ शृंगीं किरकोळ जखमी झाले होते. स्थानिकांनी येथे जमवून वाद मिटवण्याचा प्रयत्न केला आणि कर्जत पोलीस ठाण्यात पळून गेलेल्या पीकअप टेम्पो चालकाच्या विरोधात तक्रार देण्याचा सल्ला देण्यात आला.

# खोपोली नगरपालिका कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड

## ३० हजार रुपये सानुग्रह अनुदान मंजूर

**खोपोली : प्रतिनिधी**



खोपोली नगरपालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांची यंदाचीही दिवाळी गोड होणार आहे. ३० हजार सानुग्रह दिवाळीपूर्वी सोमवारी (दि.६) आयोजित बैठकीत मंजूर केले आहे.


दिवाळी निमित्ताने कर्मचाऱ्यांना बोनस जाहीर केला जातो. खोपोली नगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना बोनस मिळावा यासाठी भारतीय कामगार कर्मचारी महासंघाचे नेते माजी नगर सेवक किशोर पानसरे यांच्या नेतृत्व खाली मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांच्या दालनात सोमवारी सानुग्रह अनुदान संदर्भात बैठकीसाठी झाली.

या बैठकीला उपमुख्याधिकारी रणजीत पवार, अंतर्गत लेखा परीक्षक अहिरे, लेखापाल तळपे, उपलेखपाल सिद्धेश खामकर, कर अधिकारी गौतम भगळे, कार्यालय अधिक्षक सोहन गुरव, विश्वास पाटील, प्रशांत कुळकर्णी, भारतीय कामगार कर्मचारी महासंघ युनिट खोपोली अध्यक्षा संगीता सोळंकी, उपाध्यक्ष चंद्रकांत शिंदे, ज्येष्ठ सल्लागार काशीनाथ गायकवाड, विठोबा म्हात्रे, सचिव मंगेश गायकवाड, दिलीप मोरे, संघटक मोहन मोरे, सहसंघटक मंगेश वाणी, महेश सोळंकी सहसंघटक हरिश्चंद्र पवार, नितिन ढोले

सानुग्रह अनुदान मंजूर झाल्यामुळे यंदाची दिवाळी गोड होणार असल्यामुळे भारतीय कामगार कर्मचारी महासंघाचे नेते किशोर पानसरे आणि मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील आदींनी आभार मानले.

# विद्यार्थ्यांनी नाटकातून दिला ‘स्वच्छता हीच खरी सेवा’चा संदेश

**मुरूड : प्रतिनिधी**



जिंदल विद्या मंदिर, साळाव शाळेतील विद्यार्थ्यांनी मुरूड तालुक्यातील नवीन चेहेर व जुने चेहेर या गावांमध्ये स्वच्छता हीच खरी सेवा या घोषवाक्याखाली नुक्कड नाटक सादर केले. दैनंदिन जीवनातील अस्वच्छतेमुळे होणारे दुष्परिणाम आणि त्यावर उपाय प्रभावी अभिनयातून त्यांनी प्रेक्षकांसमोर मांडले.

विद्यार्थ्यांनी रस्त्यावर टाकलेला कचरा, प्लास्टिकचा अतिरेक व पाण्याची नासधूस यामुळे होणाऱ्या समस्यांचे जिवंत चित्रण केले. त्यानंतर कचरा कचरापेटीत टाकणे, परिसर स्वच्छ ठेवणे, झाडे लावणे आणि स्वच्छ भारत अभियानात सक्रिय सहभाग घेणे यांसारखे सकारात्मक संदेश त्यांनी दिले.

कार्यक्रमाच्या शेवटी शाळेचे प्राचार्य मुकेश ठाकूर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत सांगितले की, स्वच्छता ही केवळ शाळेपुरती मर्यादित नसून ती प्रत्येकाची जबाबदारी आहे. आपण सर्वांनी मिळून आपले गाव, शाळा आणि समाज स्वच्छ ठेवला पाहिजे. तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंकज मलिक यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत सांगितले की, स्वच्छता ही समाजाच्या प्रगतीची पहिली पायरी आहे. आज या मुलांनी सादर केलेले नाटक ही केवळ कला नाही तर समाजासाठी दिलेला जिवंत संदेश आहे.

# कर्जत चारफाटा येथे लवकरच सिग्नल यंत्रणा

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत प्रवेश करण्यासाठी महत्वाचा चौक असलेल्या कर्जत चारफाटा येथे दररोज वाहतूक कोंडी होत आहे. वाहतूक कोंडी फोडण्यासाठी अनेक उपाययोजना पोलिसांनी केल्या, मात्र वाहतूक कोंडी कमी करण्यात यश आले नाही. त्यामुळं आता कर्जत पोलिसांनी आता चारफाटा येथे सिग्नल यंत्रणेचा वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. कर्जत शहर बचाव समिती कडून अनेक महिने ही मागणी केली असून मागणीला यश आले असून सिग्नल यंत्रणा बसण्याचे कार्य अंतिम टप्प्यात आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून ट्रफीकने कर्जतचे नागरीक खुप त्रस्त होते. वाहन चालक यांच्या सततच्या तक्रारीचा विचार करून कर्जत शहर बचाव समितीने कर्जत नगरपरिषदेला निवेदन दिले होते. निवेदनाची कर्जत प्रशासनाने तसेच कर्जत पोलीस स्टेशन यांनी तातडीने दखल घेऊन सिग्नल सिस्टीम बसविण्याबाबत तत्परता दाखवुन त्याची निविदा काढली आहे. सिग्नल यंत्रणा बसवण्याच्या कामाची सुरुवात झाली असून चारफाटा येथे सिग्नल बसवण्याचे काम सुरु झाले आहे. याशिवाय शहरातील त्यानंतर श्रीराम पुल तसेच छत्रपती संभाजी महाराज चौक त्याचबरोबर बाजारातसुद्धा सिग्नल यंत्रणा बसवण्यात येणार आहे. तसेच हाय रेज्युलेशन कॅमेरासुद्धा बसविण्यात येणार आहे ज्याने ॲटोमेटीक नियम तोडणाऱ्यांवर कारवाई होईल. कर्जत शहर बचाव समितीने ही मागणी अनेक महिने लावून धरली होती आणि या मागणीला यश आल्याने समितीचे प्रमुख ॲड कैलास मोरे यांनी समाधान व्यक्त केले आहे.

# माणगावात आज मोफत नेत्र तपासणी

**माणगाव : प्रतिनिधी**

शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगाव यांच्यातर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन बुधवारी (दि.८) सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत जुने एसटी स्टँड माणगाव जवळ वृत्तपत्र विक्रेते नितीन मेथा यांच्या बाजूला असणाऱ्या महेंद्र पितांबर मेथा यांच्या प्रशस्त जागेत हॉलमध्ये करण्यात आले आहे.

शिबिराचा लाभ जास्तीत जास्त गरीब गरजू लोकांनी घ्यावा, असे आवाहन विजयशेठ मेथा यांनी केले आहे. सदरचे शिबीर हे दरमहिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या बुधवारी होत असते.

आतापर्यंत २८९२ हुन अधिक मोतीबिंदू असणाऱ्या रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. या शिबिराला दरमहिन्याला नेत्ररुग्णांचा मोठा असा प्रतिसाद लाभत आहे.


**बस विकणे आहे**

संस्थेची बस आहे त्या स्थितीत विकणे असून इच्छुक व्यक्तींनी संस्थेच्या कार्यालयात संपर्क करावा.

पत्ता :- सहकार द्वारका सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, मोरबे, तालुका पनवेल जिल्हा रायगड. पिन कोड ४१०२०६

**संपर्क क्रमांक : ८२६२८९२२४८**


# शास्तीमाफी अर्जाच्या मुदतवाढीसाठी निवेदन सादर

**कर्जत : प्रतिनिधी**

महायुती सरकारने संपूर्ण राज्यातील नगर परिषदा व नगरपंचायतींमधील थकीत घरपट्टीवरील शास्ती माफ करण्याचा जनहिताचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. १० ऑक्टोबर २०२५ अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत आहे. ही मुदत वाढवावी म्हणून भारतीय जनता पक्षाच्या शिष्टमंडळाने मुख्याधिकाऱ्यांना निवेदन दिले.

कर्जत नगर परिषदेने अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत १० ऑक्टोबर २०२५ निश्चित केली होती, मात्र अनेक मालमत्ता धारक नोकरी, व्यवसायामुळे बाहेरगावी स्थायिक असल्याने तसेच नवरात्र-दसरा सणामुळे नागरिकांना अर्ज सादर करण्यात अडचणी आल्या. त्या पार्श्वभूमीवर कर्जत नगरपरिषद मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांना अर्ज स्वीकृतीची मुदत आणखी १५ दिवसांनी वाढवावी, अशी मागणी करणारे निवेदन भारतीय जनता पक्षाच्या वतीने सादर करण्यात आले.

या वेळी किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सुनील गोगटे, माजी तालुका अध्यक्ष शिरीष कदम, युवा मोर्चा कर्जत शहराध्यक्ष सर्वेश गोगटे, बिलाल आढाळ, राजीव देशपांडे आदी उपस्थित होते.


**पनवेल महानगरपालिका**

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

कार्यालय :-२७४५८०४०/४१/४२ ई मेल:- panvelcorporation@gmail.com

अग्निशमनविभागः- २७४६१५०० फॅक्स नं:- ०२२-२७४५२२३३

| अनु.क्र | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १ | निविदा क्र./प.म.पा./अ.वि./२०२५ | पनवेल महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतमध्ये आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये अग्निशमन यंत्रणा ०१ वर्षाच्या देखभाली सह बसविणे. |

या निविदेबाबतची विस्तृत माहीती शासनाच्या http://mahaetenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०८/१०/२०२५ ते दिनांक १६/१०/२०२५ रोजी दुपारी ०३:०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल. संबंधित निविदा धारकांनी याची नोंद घ्यावी.

**जा.क्र :-पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ५०५/५१९/२०२५**
**दिनांक :- ०७/१०/२०२५**

**सही/-**
**उपायुक्त मुख्यालय (I)**
**पनवेल महानगरपालिका**



**उरण नगरपरिषद, उरण**

**ता. उरण, जिल्हा-रायगड, पिन कोड-४०० ७०२**

**जाहीर नोटीस**

ज्या अर्थी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११ अन्वये उरण नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता मतदार यादी तयार करणेसाठी मा. जिल्हाधिकारी, रायगड यांनी मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे.

आणि ज्या अर्थी मा. राज्य निवडणूक आयोगाचे आदेशान्वये व ठरवून दिलेल्या कार्यक्रमानुसार दिनांक ०१ जुलै, २०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या विद्यानसभा मतदार संघाच्या यादीवरुन उरण नगरपरिषदेच्या प्रभाग क्र.१ ते १० या प्रभागांच्या प्रारुप मतदार याद्या छापून घेऊन मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांनी तयार केलेल्या आहेत. त्या याद्या संबंधित मतदारांचे माहितीसाठी दिनांक ०८/१०/२०२५ रोजी प्रसिध्द करणेंत येऊन नागरीकांच्या माहितीसाठी पुढील ठिकाणी उपलब्ध करण्यांत आलेल्या आहेत.

१) जिल्हाधिकारी रायगड यांचे संकेत स्थळावर २) उरण नगरपरिषद कार्यालय नोटीस बोर्ड ३) तहसिल कार्यालय उरण जि. रायगड नोटीस बोर्ड ४) उरण नगरपरिषद प्राथमिक शाळा क्र. ३ मोरा-उरण नोटीस बोर्ड येथे तसेच उरण नगरपरिषदेच्या https://mahaulb.in/PortalSite//app/home या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

त्याअर्थी सदरची मतदार यादी तयार करताना काही चुका राहिलेल्या असल्यास त्या दुरुस्त करण्या संदर्भात दिनांक ०८/१०/२०२५ ते दिनांक १३/१०/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत संबंधितांकडून सूचना व हरकती मागविण्यात येत आहेत. यासंदर्भात पुढील बाबी विचारांत घेतल्या जातील.

१) काही लेखनिकांच्या, टंकलिपीकांच्या किंवा संगणकीय मुद्रण दोष असल्यास,
२) एका प्रभागांतील नावे चुकून दुस-या प्रभागामध्ये अंतर्भूत झाली असतील तर,
३) नगरपरिषदेच्या संबंधित प्रभागाच्या क्षेत्रांतील नांवे दिनांक ०१ जुलै, २०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभा मतदार यादीत असूनही नगरपरिषदेच्या मतदार यादीमध्ये वगळली गेली असल्यास,

सबब, नागरीकांच्या वरील बाबत काही सूचना अगर हरकत असल्यास त्यांनी उक्त नमूद केल्याप्रमाणे विहीत मुदतीमध्ये सादर कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या सूचना वा हरकतींचा कोणताही विचार केला जाणार नाही.

**जा.क्र. उनप/सा.प्रवि./प्रा.मतदारयादी/१६७३/२०२५-२०२६**
**उरण नगरपरिषद कार्यालय उरण,**
**दिनांक ०८/१०/२०२५**

**सही/-**
**(समीर जाधव)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद, उरण**



**जाहिर नोटीस**

जाहीर सूचना देण्यात येत आहे की, माझे अशिल हे **श्रीमती. आशिया बेगम मोहम्मद युसुफ पारकर,** यांचेकडून उभयपक्षियांत ठरल्याप्रमाणे सदर जमिनीची जंगल विभाग कडून तसेच त्या संदर्भित विभागाकडून पूर्व परवानगी घेवुन विकत घ्यावयाचे ठरविले आहे.

**जमिनीचे वर्णन**

| भूमापन क्र. व उपविभाग | एकूण क्षेत्रफळ हे-आर-चौ.मी. | गाव | तालुका | जिल्हा |
|---|---|---|---|---|
| ७८/१/अ/१ | १०.३५.०० | रानसई | उरण | रायगड |

सदर जमीनीवर दिनांक १८-०९-२००१ रोजी महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) कायदा १९७५ अंतर्गत संपादन झालेल्या स.नं. च्या ७/१२ उतार्यावर कब्जेदार सदरी महाराष्ट्र शासन वन खाते अशी नोंद ठेवून इतर हक्कामध्ये जमीन मालकाचे नाव नोंदवून महाराष्ट्र खाजगी वने अधिनियम चौकशीवर प्रलंबित अशी नोंद ठेवली आहे. व त्यावर माननीय आयुक्त कोकण विभाग यांचे परिपत्रक क्र. मशा/कार्या/ २/खाजगी वने/ मावि / ७५०/९९ दिनांक १९-०७-२००० व माननीय उपवन संरक्षक अलिबाग यांचेकडील जावक क्र. ब/२०/जमिन / ३६३/२००१-२००२ दिनांक १७-०४-२००१ व माननीय तहसीलदार सा. उरण, यांचेकडील आहेश क्र. जमिनबाब / ......२/ वन जमिन / २००१ अन्वये नोंद केली आहे.

कोणाही व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती, कंपनी, कार्यालय यांचा सदर जमिनीसाठी किंवा त्यावर त्याच्या भागावर विक्री, गहाणवट, लिअन, भेट किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याच्या पृष्टथ्यार्थ त्यांनी अशा हक्काबाबत / हरकतीबाबतची सूचना त्यात हक्क हरकतीचे स्वरूप यांची माहिती अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणाऱ्याकडे त्यांच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या अट सदर करावी आणि जर तसे केले नाही तर असे गृहीत धरण्यात येईल की, सदर जमीन हा सर्व प्रकरच्या बंधनातून आणि अन्य हक्कापासून आणि अधिकारापासून किंवा अन्य प्रकारच्या बंधनापासून मुक्त असेल आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल आणि माझे अशिल कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता सदर जमीन हस्तांतरित करण्याच्या दृष्टीने दिलेली मुदत संपल्यानंतर कार्यवाही करतील.

**दिनांक : ०७/१०/२०२५**

**सही/-**
**राकेश वि. म्हात्रे**
**(ॲडव्होकेट)**
**कार्यालय : २०३, शाह हेरीटेज, प्लॉट क्र. ९, सेक्टर-४२अ, सीवूड्स, नेरूळ, नवी मुंबई-४०० ७०६.**



**जाहिर नोटीस**

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **स्वप्नील दिलीप म्हात्रे व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजेः विंधणे (५५३३२४)**
**(PU-ID: ३३४५१५९६०३१), तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट कमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १५६/१/अ/२/अ खाते कमांक : ४४७ | २ | ०.४४.४० पो.ख. ०.०८.९० | २.८७ |
| | | एकुण ०.५३.३० | |

एकुण क्षेत्र ०.५३.३० आर या मिळकतीचे खरेदीखत

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी

**दिनांक : ०८/१०/२०२५**

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
**बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड कमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा - रायगड- ४१०२०६**
**मो.क्र. ९९२०४७५८०१**

# पाईपलाईन फुटल्याने पाण्याची नासाडी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महानगर गॅस पाईपलाईनचे काम होत असताना मोहोपाडा प्रवेशव्दारासमोर पिण्याच्या पाण्याची पाइईपलाइन फुटल्याने हजारो लिटर पाणी वाया जात आहे.

दांड-रसायनी रस्त्यावरील मोहोपाडा हे मुख्य बाजारपेठेचे केंद्रबिंदू आहे. येथे रसायनी पाताळगंगा औद्योगिक परिसरातील नागरिक बाजारहाट करण्यासाठी येत असतात.



मोहोपाडा थांब्याजवळील प्रकार



याच रस्त्यावर महानगर गॅस पाईपलाईन टाकण्यात आली आहे. या गॅस पाईपलाईनचे वर्षभरात दोन ते तीन महिनाआड खोदकाम होत असल्याने रस्त्याला खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाली आहे.

या रस्त्यावरून प्रवास करताना वाहनचालक नागरीकांना नाहक त्रास होत आहे. या कामामुळे अपघातांना ही आमंत्रण मिळत आहे, तर पाइपलाइन फुटून पाच दिवस झाले असून एमआयडीसी, जीवन प्राधिकरणाकडून दुर्लक्ष होत आहे. परिसरातील काही गावांत पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवत आहे, अशी स्थिती असताना गेल्या पाच ते सहा दिवस रोज हजारो लिटर पाण्याची नासाडी होत आहे.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातर्फे डोनेशन ड्राईव्ह

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे 'अमृत महोत्सवी वर्ष' वर्षभर साजरा करत आहोत. त्याचे औचित्य साधून 'डोनेशन ड्राईव्ह'चे आयोजन करण्यात आले होते.

टाटा कॅन्सर हॉस्पिटल मधील बालरुग्ण विभागासाठी हा उपक्रम राबविण्यात आला होता. हा उपक्रम ७ ऑक्टोबर २०२५या दिवशी राबविण्यात आला. या डोनेशन ड्राईव्हला संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख उपस्थित होते.



या उपक्रमाचा मुख्य उद्देश रुग्णालयातील बालकांना आनंद देणे आणि समाजात सेवा व सहकार्याची भावना निर्माण करणे हा होता. या उपक्रमास प्राचार्या निशा नायर यांचे मार्गदर्शन लाभले.

# अभ्यासक्रमांच्या पहिल्या तुकडीचे पंतप्रधानांच्या हस्ते होणार उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रभूषण डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पनवेलमध्ये सात अल्प मुदत अभ्यासक्रम चालू होणार आहेत. अभ्यासीपध्दतीने राज्यातील ४००पेक्षा अधिक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये चालविण्यात येणाऱ्या नवयुगीन व पारंपरिक अल्पकालीन अभ्यासक्रमांच्या पहिल्या तुकडीचे ८ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन उद्घाटन करण्यात येणार असल्याची माहिती प्राचार्य, महाराष्ट्र भूषण डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पनवेल नि.के. चौधरी यांनी दिली.

देशात मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्वात विकासाची नवनवीन शिखरे पादाक्रांत केली जात आहेत. भारत आता जगातील चौथ्या क्रमांकाची मोठी अर्थव्यवस्था झालेला असून लवकरच तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याच्या मार्गावर आहे. महाराष्ट्रदेखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सक्षम नेतृत्वात आर्थिक, औद्योगिक, सामाजिक क्षेत्रातील देशातील आपले अग्रस्थान कायम ठेवून आहे. प्रगतीची ही गती व दिशा कायम ठेवण्यासाठी उद्योग क्षेत्र व सेवा क्षेत्र महत्त्वाची भूमिका बजावत आहे. तसेच यातून स्वयंरोजगारासाठी आवश्यक असणारी मार्गदर्शनदेखील युवांना प्राप्त होऊ शकते.

जिल्हातील जास्तीत जास्त युवा, गृहिणी यांनी सवलतीच्या शुल्कात चालविल्या जाणाऱ्या या अल्पकालीन अभ्यासक्रमांसाठी नोंदणी करण्यासाठी www.msbsvet.edu.in या संकेतस्थळावर सर्व अभ्यासक्रमांची माहिती व नाव नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. जिल्ह्यातील सर्व लाभार्थ्यांनी महाराष्ट्र भूषण डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पनवेलशी त्वरीत संपर्क करावा.

# दिव्यांग स्टॉलधारकांना परवाने देण्याची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मावळचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे साहेब दिव्यांग संघटनेतर्फे पनवेल महानगरपालिका हद्दीतील दिव्यांग स्टॉल धारकांना त्वरित परवाने मिळावे याचे निवेदन ६ ऑक्टोबर रोजी देण्यात आले. यावेळी महाराष्ट्र दिव्यांग विकास फाउंडेशनचे जिल्हाप्रमुख भरत ज्ञानदेव जाधव, दिव्यांग विकास आघाडीचे उत्तर जिल्हा संयोजक विलास फडके, अतुल रायबोले, नवनाथ गाढवे आणि इतर दिव्यांग बांधव उपस्थित होते.



पनवेल महापालिका हद्दीत दिव्यांग स्वयंरोजगार (स्टॉल) माध्यमातून अनेक वर्षापासुन व्यवसाय करत आहेत. परंतु त्यांना पनवेल महापालिका वारंवार अतिक्रमण कारवाई करत आहे. त्यामुळे दिव्यांग स्टॉल धारकांवर नेहमी भीतीची टांगती तलवार असते. या विरोधात अनेक आंदोलने उपोषणे केली, मोर्चे काढले परंतु पनवेल मनपा आयुक्त फक्त आश्वासन देतात की सर्व दिव्यांग स्टॉल धारकांचे सर्वे करून तुम्हाला परवाने देतो. आजपर्यंत पनवेल महानगरपालिका स्थापन झाली तेव्हापासून चार वेळा आयुक्त आले आणि गेले.

प्रत्येक आयुक्त फक्त आश्वासनाची पाने दिव्यांगांच्या तोंडाला पुसत असल्याचा आरोप दिव्यांग बांधव करत आहेत. ठराविक संघटनांच्या स्टॉल धारकांना परवाने दिलेले आहेत. इतर दिव्यांगांना परवाने का देत नाहीत हा दुजाभाव, भेदभाव का? केला जात आहे, असा सवाल विचारला जात आहे.

खासदारांनी याकडे स्वतः लक्ष घालून पनवेल महानगरपालिका हद्दीतील दिव्यांग स्टॉलला कायमस्वरूपी परवाने मिळवून द्यावेत, अशी मागणी या वेळी करण्यात आली.

# गव्हाण विद्यालयाची पाताळगंगा येथील 'इदेमित्सु'ला औद्योगिक क्षेत्रभेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमधील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांची औद्योगिक शैक्षणिक क्षेत्रभेट पाताळगंगा येथील 'इदेमित्सु ल्यूब इंडिया प्रा.लिमिटेड ' ह्या प्रख्यात आंतर्राष्ट्रीय इंजिन तेल व वंगण उत्पादक जपानी कंपनी मध्ये आयोजित करण्यात आली.

'इदेमित्सु' ही इंजिन ऑईल आणि ल्युब्रिकंट्स व वाहनांसाठी लागणाऱ्या विविध तेलांची विक्री करणारी विशेषतः भारतातील इंजिन ऑईल आणि ल्युब्रिकंट्सच्या निर्मितीमध्ये आघाडीवरील ' इदेमित्सु ल्यूब इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ' ही रसायनी जवळील पातळगंगा येथील २४ एकरच्या विस्तीर्ण जागेवरील आंतरर्राष्ट्रीय यंत्र इंधन व वंगण उत्पादक कंपनी गत बारा वर्षांपासून इंधन व वंगण निर्मिती करते. कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक नामीगीशी तोशिया, उपवस्थापकीय संचालक अकिनोरी हारा व उपव्यवस्थापक गोपाल सुरवसे आदींचे विशेष सहकार्य ह्या क्षेत्रभेटीसाठी लाभले.

गव्हाण विद्यालयाची औद्योगिक प्रशिक्षण क्षेत्रभेट चार टप्यात आयोजित करण्यात आली व दोनशे विद्यार्थ्यांनी या क्षेत्रभेटीचा अनुभव घेतला. या वेळी विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष कंपनीच्या कार्यस्थळी भेट देवून कंपनीचे अंतर्गत कामकाज, उत्पादन प्रक्रिया, वितरण, पॅकेजिंग व व्यवस्थापन इत्यादी विभागांची तपशीलवार माहिती घेतली.

इंधन व वंगण निर्मिती कशी होते. प्रोसेसिंग युनिट, पॅकेजिंग युनिट, वितरण व्यवस्था, वेअरहाऊस आदी विविध विभागांच्या माध्यमातून प्रत्यक्ष अनुभवताना विद्यार्थ्यांनी औद्योगिक विकासाचे महत्त्व जाणले. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने,रोबोटच्या सहाय्याने कमीत कमी मानवी श्रमात कौशल्यपूर्ण आणि शिस्तबद्ध,नियोजनबद्ध व्यवस्थापन व उच्च दर्जाचे उत्पादन क्षमता असणारा कारखाना कसा असावा याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'इदेमित्सु ल्युब इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनी' होय अशी चर्चा विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये रंगली. स्वच्छता व टापटीप त्याचप्रमाणे भोजन व्यवस्था अत्यंत उत्तम दर्जाची होती.

विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली ही औद्योगिक क्षेत्रभेट यशस्वी झाली. इयत्ता दहावीच्या सुमारे २०० विद्यार्थ्यांसोबत विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांचेसह उपशिक्षक संदीप भोईर, उज्वला म्हात्रे, प्रशांत परदेशी,वृषाली म्हात्रे, संपदा म्हात्रे, सागर रंधवे, चारुशीला ठाकूर, विशांत ठाकूर, प्रमोद करावकर, गणेश भोईर आदी शिक्षक सहभागी झाले.

प्राचार्या व संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर यांचेसह उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, आजिव सेवक देवेंद्र म्हात्रे आदींनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.



# महापालिका मुख्यालयात महर्षी वाल्मिकी जयंतीनिमित्ताने अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात ७ ऑक्टोबर रोजी महर्षी वाल्मिकी जयंती निमित्ताने प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



या वेळी आयुक्त मंगेश चितळे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, उपायुक्त स्वरूप खारगे, लेखा परिक्षक निलेश नलावडे, उप लेखापरिक्षक संदिप खुरपे, जनसंपर्क अधिकारी नितिन साके, तसेच राष्ट्रीय मुलनिवासी बहुजन कर्मचारी संघाचे अध्यक्ष शरद कांबळे, उपाध्यक्ष कैलास सोळंकी, कार्याध्यक्ष प्रकाश गायकवाड, महासचिव सतिश चींडीलिया, सचिव सागर खरारे, कोषाध्यक्ष भावेश चंदने, सहसचिव गुरूनाथ भगत, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख किर्ती महाजन, महापालिका अधिकारी व कर्मचारी महर्षी वाल्मिकी समाज मंडळाचे सदस्य, जय महाकाली मित्र मंडळाचे सदस्य, आरोग्य कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पनवेल : दापोली ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच गजानन पाटील यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे पनवेल पश्चिम मंडळ अध्यक्ष रूपेश धुमाळ, राकेश गायकवाड, समीर केणी, मनखुश नाईक आदी उपस्थित होते.

# सुकापूर येथे एकदिवसीय दांडिया रास उत्साहात





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एकता मित्र मंडळाच्या वतीने कोजागिरी पौर्णिमेनिमित्त आयोजित एकदिवसीय दांडिया रास सोहळा सोमवारी नृसिंहेश्वर कुंज सुकापूर येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या वेळी भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, तसेच भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी नगरसेवक अजय बहिरा यांच्या सह प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

मुकेश उपाध्ये यांच्या जय अंबे ग्रुपतर्फे सादर करण्यात आलेल्या ऑर्केस्ट्रा कार्यक्रमाने उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. तसेच उपस्थितांना मसाला दुधाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामपंचायत सदस्य महेश पाटील, जिल्हा परिषद माजी सदस्य अमित जाधव, ग्रामपंचायत सदस्य प्राची जाधव यांच्यासह मंडळाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

कोजागिरी पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर दांडिया आणि पारंपरा यांचा सुंदर संगम या सोहळ्यात अनुभवायला मिळाला. या वेळी उत्कृष्ट आयोजनाबद्दल पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी कौतुक केले.

# आपटा येथे रक्तदान शिबिर

**रसायनी : प्रतिनिधी**

आपटा येथे रविवारी (दि.५) मराठी शाळेमध्ये जे रक्तदान शिबिर झाले त्यामध्ये जवळपास ५० युनिट म्हणजे ५० बाटल्या टोटल रक्तदान येथे जमा केले गेले.

आपटयातील कुमार जयेश भोईर या मुलाला दर पंधरा दिवसांनी रक्त द्यावे लागते, कारण तो थँलेसिमियि त्याने या रोगाने आजारी असल्यामुळे त्यालाही दर पंधरा दिवसांनी रक्त द्यावे लागते. त्याबद्दल आपट्यातील प्रेम ग्रुप हे शिबिर आयोजित आणि हे रक्तदान शिबिर डी वाय पाटील ब्लड बँकच्या सौजन्याने आयोजित केले होते. येथे जो ५० पट्ट्या रक्त जमा झाले भविष्यात हे जयेश भोईर या मुलाला देण्यात येईल.



# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात ओरल हायजिन कॅम्प

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात मंगळवारी (दि.७) या दिवशी ओरल हायजिन कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते.

जर्नादन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांचे 'अमृत महोत्सवी वर्ष' वर्षभर साजरा करत आहोत. त्याचे औचित्य साधून विद्यालयात ११वी विज्ञान व वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी ओरल हायजिन कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. रोटरी क्लब ऑफ नवी मुंबई सनराईज आणि भारती विद्यापीठ डेंटल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने या कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते.



या शिबिरात तज्ञ दंतचिकित्सकांनी विद्यार्थ्यांना दातांची योग्य काळजी कशी घ्यावी, दात घासण्याची योग्य पध्दत, तसेच मुख स्वच्छतेचे महत्व याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी या शिबिरात उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला आणि अनेक शंका विचारुन आपले दंतज्ञान वाढविले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जागरुकता निर्माण झाली.

या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणेपदी संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी.देशमुख, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी, प्राचार्या निशा नायर आदी उपस्थित होते.

# कोजागरी पौर्णिमेनिमित्त बजरंग दलाकडून पथनाट्याद्वारे जनजागृती

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

अंतरराष्ट्रीय बजरंग दल सावळे रसायनी यांच्यावतीने करुणा केदारी यांच्या मार्गदर्शनाखाली कोजागरी पौर्णिमेच्या निमित्ताने लव जिहाद, गो हत्या, धर्मांतरण इत्यादी विषयांवर पथ नाट्याच्या रूपाने जनजागृती केली.

सुविधा तुळशीदास कर्णेकर आणि करुणा क्रांतीश्याम गाताडे या बाल कलाकारांनी पथनाट्यातून केला. या वेळी सचिन खुळे (कोकण प्रांत महामंत्री), भक्तीताई भाबळ (मातृ शक्ती रायगड अध्यक्ष), जनार्दन मालुसरे, प्रशांत तांबोळी, रवींद्र ठाकूर, करण गायकवाड, सुभाष कोकणे तसेच सावळे गावातील बजरंगी जयवंत म्हात्रे, संजय केदारी, नामदेव केदारी, झिंगे सर, आणि समस्त गावकरी उपस्थित होते.



# वाहन अडवून तिघांना मारहाण

**पनवेल : वार्ताहर**

वाहन अडवून तिघांना मारहाण केल्याची घटना खांदेश्वर रेल्वे स्टेशनच्या परिसरात घडली आहे.

विश्वजीत म्हात्रे हे मित्रांकडे पार्टीसाठी गेले होते. पहाटेच्या सुमारास ते मित्रांसह गाडीने निघाले. ते खांदेश्वर रेल्वे स्टेशनच्या अलीकडील चौकाजवळ आले असता त्यांच्या गाडीला दोन कार आणि तीन ते चार मोटरसायकलने आडवले. त्यावेळी १५ ते २० जणांनी विश्वजीत म्हात्रे यांच्यासह त्यांच्या मित्राला शिवीगाळ करत धमकावले आणि एकाने फायबर पाईप आणि पीव्हीसी पाईपने कारच्या काचा फोडल्या. या वेळी चाकूसारख्या टोकदार वस्तूने मारहाण केली.

# रायगड जि.प.च्या आरक्षण सोडतीबाबत उत्सुकता

## इच्छुक उमेदवारांच्या १३ ऑक्टोबरकडे नजरा; राजकीय भवितव्य ठरणार

**माणगाव : बातमीदार**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत रायगड जिल्हा परिषदेत मोठ्या प्रमाणावर राजकीय घडामोडी घडणार आहेत. या पार्श्वभूमीवर १३ ऑक्टोबरला रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्यांची आरक्षण सोडत जाहीर करण्यात येणार आहे, तर २७ ऑक्टोबरपर्यंत अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. त्यामुळे इच्छुक उमेदवारांच्या नजरा आरक्षण सोडतीवर लागल्या आहेत.

सध्या सर्व पक्षांच्या नेत्यांनी आणि इच्छुक उमेदवारांनी वैयक्तिक भेटीगाठीवर जोर दिला आहे. कधीही आचारसंहिता लागू शकणार असल्याने उद्‌घाटन आणि भूमीपूजनाचे सोहळे उरकून घेतले जात आहेत. या वेळी रायगड जिल्हा परिषद अध्यक्षपद सर्वसाधारण जागेसाठी यापूर्वीच आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. येत्या मंगळवारपासून याद्या निश्चीतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात येणार आहे. २७ ऑक्टोबरपर्यंत अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध करायच्या आहेत.

रायगडात जिल्हा परिषदेचे ५९, तर पंचायत समितीचे ११८ मतदारसंघ आहेत. या मतदारसंघात वाढ झालेली नाही. यामध्ये वाढ होणे आवश्यक होते. त्यामुळे इच्छुक उमेदवारांनी नाराजी व्यक्त केली. काही मतदारसंघ भौगोलिक आणि लोकसंख्येच्या तुलनेत अवाढव्य आकाराचे आहेत. त्यामुळे उमेदवारांना खूप मेहनत घेऊन चांगली कामगिरी करावी लागणार आहे तसेच मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो असा अनुभव काहींना आलेला आहे.



पंचायत समितीच्या मतदार याद्या अंतिम करण्याचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे, मात्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती मतदारसंघाचे आरक्षण जाहीर झालेले नव्हते. राज्य निवडणूक आयोगाने आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती मतदारसंघाचे आरक्षण जाहीर करण्याचा कार्यक्रम जाहीर केला आहे. १३ ऑक्टोबर रोजी आरक्षण सोडत काढली जाणार आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यात इच्छुक उमेदवारांच्या आशा-आकांक्षा पल्लवित झाल्या आहेत, तर दुसरीकडे आरक्षण काय जाहीर होते डोळे लागले आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेल्या साडेतीन वर्षांपासून रखडल्या आहेत. ओबीसी आरक्षणाचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने या निवडणुका रखडल्या होत्या, मात्र सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारीच्या आत निवडणुका घेण्याचे आदेश निवडणूक आयोगाला दिले आहेत. त्यानुसार निवडणूक आयोग निवडणुकीच्या कामाला लागले आहे.

१३ ऑक्टोबर रोजी जिल्हा परिषद मतदारसंघासाठी जिल्हाधिकारी, तर पंचायत समिती मतदारसंघासाठी तहसीलदार आरक्षण सोडत काढणार आहेत. रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचे आरक्षण सोडत जाहीर झाल्याने इच्छुक उमेदवार आरक्षणाकडे डोळे लावून बसले आहेत. जिल्हा परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने सर्व राजकीय पक्ष आता जोमाने कामाला लागल्याचे चित्र दिसत आहे.

रायगड जिल्हा परिषदेवर झेंडा फडकविण्यासाठी सर्वच राजकीय पक्ष तयारीला लागले आहेत. पनवेल, उरण आणि पेण तालुक्यात भारतीय जनता पक्षाचे निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले आहे. तेथे प्रशांत ठाकूर, महेश बालदी आणि रविशेठ पाटील हे तीनही आमदार भाजपचे असून धैर्यशील पाटील हे राज्यसभा खासदार भाजपचे आहेत. अलिबाग, महाड आणि कर्जत तालुक्यात शिवसेनेचे तीन आमदार आहेत, तर श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादीचे एकमेव आमदार असून सुनील तटकरे हे लोकसभा खासदार आहेत. त्यामुळे जिल्ह्यात महायुती झाल्यास त्यांचा विजय सहजपणे साध्य होऊ शकतो.

## रोटरी क्लबतर्फे परिसंवाद

**खोपोली : प्रतिनिधी**

रोटरी क्लबच्या वतीने सेवा प्रकल्प आणि सार्वजनिक प्रतिमा या विषयावर विभागीय स्तरावरील परिसंवाद खारघरच्या ए.सी.पाटील महाविद्यालयामध्ये रविवारी झाला. या वेळी पत्रकार नितीन भावे यांचा प्रशस्तीपत्र आणि ग्रंथभेट देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास 'रोटरी'चे जिल्हा प्रांतपाल संतोष मराठे, जिल्हा सचिव सुनील कुरूप प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. 'रोटरी'च्या आरोग्य, पर्यावरण, आनंदी गाव, गो संवर्धन या व अन्य सात सेवा विभागांमध्ये कोणकोणते प्रकल्प कसे राबवू शकतो यावर डॉ. सुमेधा भोसले, शोभा राव, संतोष परदेशी, विजय रायकर, अविनाश कोहिनकर, राजकुमार सराफ यांनी अतिशय उपयुक्त माहिती दिली.

नितीन मुळे यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी 'रोटरी'ची प्रतिमा जनमानसात खूपच चांगली आहे. ती आताच्या सोशल मीडियाच्या जगात सर्वदूर कशी पोहोचवता येईल, रोटरीचे कार्य जास्तीत जास्त लोकांपर्यंत कसे पोहोचवता येईल, त्यासाठी काय करावे याबाबत अतिशय उपयुक्त आणि सखोल माहिती दिली.

खारघर रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. रविकिरण आणि पूर्व अध्यक्ष डॉ. सागर गुंडेवार यांनी परिसंवादाच्या आयोजनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. परिसंवादामध्ये डिस्ट्रिक्ट ३१३१मधील ११५ सदस्यांनी सहभाग नोंदवला. रितेश कुमार यांनी शेवटी आभार मानले.

या कार्यक्रमामध्ये नितीन भावे यांचा पत्रकारितेतील योगदानाबद्दल 'रोटरी'चे प्रांतपाल संतोष मराठे, माजी प्रांतपाल पंकज शहा, सुनील कुरूप यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र आणि ग्रंथभेट देऊन सन्मान करण्यात आला.

## राजिपच्या वडगाव शाळेत वाचन प्रेरणा कार्यक्रम, विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**चौक : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद वडगाव शाळेत क्रेस्ट चा गोष्टरंग हा कार्यक्रम संपन्न झाला,पुस्तक न वाचणारी मुलगी या नाट्याच्या माध्यमातून वाचन प्रेरणा मिळाली, असे या कार्यक्रमात भाग घेणाऱ्यांनी सांगितले. रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत अल्काईल अमाईन्सच्या उड्ठ मधून क्रेस्ट चा कार्यक्रम सुरू असून. त्यामधून आज विद्यार्थ्यांना वाचन गोडी लागावी या उद्देशाने संतोष शेटे,महेश वाळुंज,नूतन खानविलकर,पुजा दळवी यांच्या गटाने गोष्टरंग हा कार्यक्रम सादर केला.यावेळी पुस्तक न वाचणारी मुलगी नाट्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाचन प्रेरणा देऊन वाचनाचे महत्त्व समजावून सांगितले.विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेत त्यातील पत्र,वाचन घटक समजून घेतले.

या कार्यक्रमाप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक सुभाष राठोड,पदवीधर विषय शिक्षिका मयुरी धायगुडे,क्रेस्ट स्वयंसेवक संकेत काठोळे व



विद्यार्थी मोठ्याप्रमाणात उपस्थित होते.

असे कार्यक्रम शाळांमधून होणे म्हणजे वाचन आवड निर्माण करण्याची पर्वणीच आहे,यातून विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व,विषय याची गोडी लागते.क्रेस्टचे धन्यवाद त्यांनी हा कार्यक्रम आमच्या शाळेत घेतला असे मुख्याध्यापक सुभाष राठोड शाळा वडगाव यांनी सांगितले.

## कासू गावात कचऱ्याचे साम्राज्य, साथरोग पसरण्याची शक्यता

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील कासू ग्रामपंचायतीच्या हद्दीत घाणीचे साम्राज्य पसरले आहे. अनेक ठिकाणी जागोजागी कचऱ्याचे ढीग साचले असून त्यामधून मोठ्या प्रमाणात दुर्गंधी येत आहे. या घाणीमुळे ग्रामपंचायत हद्दीत साथीचे रोग पसरण्याची शक्यता निर्माण झाली आहे.





कासू पांडापूर व पाटणी गावाच्या प्रवेशद्वारावरच मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढीग लागले आहेत तसेच कासू रेल्वे स्टेशन परिसरातसुद्धा मोठ्या प्रमाणात कचरा पसरला आहे. कासू गावातील तळ्याभोवतीदेखील कचऱ्याचे आहेत. या कचऱ्यामुळे गावात भटक्या कुत्र्यांची व उंदीर, घुशींचीही संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. परिणामी रोगराईची भीती अधिकच वाढली आहे.

कासू गावात असलेल्या शारदा विद्यामंदिर या हायस्कूलमध्ये येणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांना भटक्या कुत्र्यांचा व घाणीचा सामना करावा लागतो. या विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. लेप्टोस्पायरसिस, डेंगू, मलेरिया व इतर साथीचे रोग पसरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. एकूणच ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

या संदर्भात बोलताना सामाजिक कार्यकर्ते मोहन वेखंडे म्हणाले की, सार्वजनिक स्वच्छता व आरोग्याची जबाबदारी ग्रामपंचायतची असते, पण सध्या ग्रामपंचायतीवर प्रशासकाची नियुक्ती आहे. अनेक वेळा आपण व इतर ग्रामस्थांनी या संदर्भात प्रशासकांना भेटण्याचा प्रयत्न केला, परंतु ते ग्रामपंचायतीमध्ये येतच नसल्याचे निदर्शनास आले. ग्रामपंचायतीकडे कचरा टाकण्याकरिता हक्काचे डम्पिंग ग्राउंड नाही तसेच घंटागाडीसुद्धा नाही. प्रशासनाने तातडीने गावातील कचरा उचलण्याकरिता योग्य ती कार्यवाही करावी. गावामध्ये मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा. ओला व सुक्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची यंत्रणा उभी करण्यात यावी. नियमितपणे नालेसफाई करावी.

या वेळी निवृत्त शिक्षक पांडुरंग तांडेल म्हणाले की, नाशवंत खाद्यपदार्थ, सडलेली फळे, इतर कचरा व प्लास्टिक पिशव्यांमुळे सामाजिक आरोग्य धोक्यात आले आहे. कासू ग्रामस्थ मंडळाचे खातेदार जयराम तांडेल यांनी गटविकास अधिकाऱ्यांनी तातडीने या प्रकरणात लक्ष घालून स्वच्छता करण्याची मागणी केली. ग्रामस्थ दत्ताराम रामचंद्र तांडेल यांनी गांधी जयंतीच्या स्वच्छता सप्ताह अंतर्गत प्रशासनाने स्वच्छता अभियान राबवून ग्रामस्थांचे आरोग्य वाचवण्याची मागणी केली आहे.

## नागोठण्यात आरोग्य शिबिरास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**नागोठणे : बातमीदार**

लायन्स सेवा सप्ताह (१ ते ८ ऑक्टोबर) अंतर्गत डिस्ट्रिक्ट ३२४ ए ४ इंटरनॅशनल लायन्स क्लबच्या माध्यमातून नागोठणे लायन्स क्लब व क्षितिज मल्टीपर्पज असोसिएशन आकेएस केअर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. बाळासाहेब ठाकरे बालोद्यान येथे फक्त महिलांसाठी मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात ११८ महिलांची तपासणी झाली.

यामध्ये ५५ महिलांचे हिमोग्लोबिन कमी असल्याचे आढळले. या महिलांना तीन महिन्यांची मोफत औषधे देण्यात आली असून पुन्हा तीन महिन्यांनी त्यांची पुन्हा तपासणी करण्यात येणार आहे, अशी माहिती एमजेएफ विवेक सुभेकर




यांनी दिली. दरम्यान शिबिरामध्ये महिलांचे हिमोग्लोबिन, डायबिटीस, ब्लडप्रेशर, वजन व इतर काही आजारांचे मोफत तपासणी करण्यात आली. महिलांना आहाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या वेळी झोन चेअरमन सुष्मिता सित्याळकर, महिला व बाल कल्याण डिस्ट्रीक्ट चेअरमन एमजेएफ विवेक सुभेकर, नागोठणे लायन्स क्लब अध्यक्ष सखाराम ताडकर, सेक्रेटरी डॉ. अनिल गिते, प्रकाश जैन, यशवंत चित्रे, विवेक सुभेकर, विलास चौलकर, जयराम पवार, सिद्धेश काळे, दीपक लोणारी, विजय शहासने, रुतुजा पांचाळ, आयकेएस फाउंडेशनचे डॉ. विक्रांत दळवी, डॉ. वसुधा बागुल, वेलनेस कोचचे संस्थापक नेहा कदम, प्रदीप कदम, अनघा कारभारी, नागोठणे माजी सरपंच निलोफर पानसरे आदी उपस्थित होते. या शिबिरावेळी तपासणीसाठी आलेल्या डॉ. नेल्सन मंडेला आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना खाऊवाटप करण्यात आले.

## अलिबाग येथे पं. दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग व सरखेल कान्होजी आंग्रे औद्योगिक प्रशिक्षण संस्था, यांच्या संयुक्त विद्यमाने ८ ऑक्टोबर, २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत सरखेल कान्होजी आंग्रे औद्योगिक प्रशिक्षण संस्था खंडाळे ता.अलिबाग येथे पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित केला आहे.

जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त अमित पवार यांनी याबाबतची माहिती दिली.

## पन्हळघर हायस्कूलमध्ये माजी विद्यार्थ्यांचे गेट-टुगेदर

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील पन्हळघर परिसरातील प्रसिद्ध जे.बी. सावंत हायस्कूल पन्हळघर (लोणेरे) या शाळेतील १९९९ ते २००१ या शैक्षणिक वर्षातील माजी विद्यार्थ्यांचा तब्बल २५ वर्षांनी गेट-टुगेदर कार्यक्रम उत्साहात व भावनिक वातावरणात झाला.

या कार्यक्रमासाठी अनेक माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी दीर्घ काळानंतर पुन्हा एकत्र आले होते. शाळेच्या प्रांगणात सर्वांच्या चेहऱ्यावर जुन्या आठवणींनी उजळलेला आनंद ओसंडून वाहत होता.

आजी-माजी शिक्षक, मान्यवर व उपस्थित पाहुण्यांचे फुलांच्या वर्षावाने स्वागताने करण्यात आले. त्यानंतर मुख्याध्यापक बाबुराव कांबळे आणि वरिष्ठ शिक्षकवर्गाच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात



आले. शाळेचे संस्थापक स्व. जे.बी. सावंत यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून सरस्वती पूजन करण्यात आले. यानंतर गुरुजनांचा यथोचित सन्मान करण्यात आला. या वेळी शंभरहून अधिक माजी विद्यार्थी उपस्थित होते.

शिक्षकांनी मनोगत व्यक्त करत शैक्षणिक जीवनातील सुंदर आठवणींना उजाळा देत मोलाचे मार्गदर्शन केले. माजी विद्यार्थ्यांनीदेखील त्या काळातील किस्से, अनुभव आणि आठवणी सांगून सर्वांना भावविवश केले. माजी विद्यार्थ्यांनी शाळेप्रती आपले प्रेम व्यक्त करत शाळेला क्रीडासाहित्य भेट दिले, ज्यामध्ये बॅट, बॉल, स्टम्प, फुटबॉल, वॉलीबॉल यांचा समावेश होता.

यानंतर सर्वांनी एकत्र केक कापून सेलिब्रेशन केले. बऱ्याच वर्षांनंतर एकत्र आलेल्या मित्र-मैत्रिणींनी फोटोसेशन करत जुन्या आठवणींना नव्या रंगात रंगवले. दुपारी सर्व शिक्षक व विद्यार्थीवर्गाने एकत्रितपणे स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. त्यानंतर शाळेची घंटा वाजवून पुन्हा एकदा वर्ग भरला अशी अनोखी आठवण जपली गेली.

या गेट-टुगेदर कार्यक्रमाला मुख्याध्यापक हनुमंत घरट, रेखा पाटील, शीतल सोनगिरे, सुभाष टेंबे, के.के. पाटील, अरुण जाधव, ज्ञानेश्वर कोटकर, संतोष कासारे, राजेंद्र कांबळे, राजेंद्र जंगम, सुरेश इंगळे, मराठे मॅडम, पांडुरंग मोहीते तसेच शिपाई रामदास भोसले, विठ्ठल मोहिते, रविंद्र सावंत, रमेश ढेपे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी नाच, गाणी, डान्स आणि गरबा सत्राने वातावरण रंगले. २५ वर्षांनंतर पुन्हा भरलेली ही शाळा जुन्या आठवणींनी आणि स्नेहभावनेने ओथंबून गेली.

## कोल्हारे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळा उभारणी कामाचे भूमिपूजन

### संविधान स्तंभही साकारणार

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील कोल्हारे ग्रामपंचायतीच्या हद्दीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा तसेच संविधान स्तंभ उभारण्याच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

कोल्हारे ग्रामपंचायतीच्या वतीने धामोते गावाच्या हद्दीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान स्तंभाचे कामाचे भूमिपूजन करण्यात आले. यानिमित्ताने नेरळ-कळंब रस्त्यावरील साई मंदिर येथून रॅली काढण्यात आली. रॅलीत विविध समाजघटक, तरुण-तरुणी, महिला आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ढोल-ताशांच्या गजरात



व जय भीमच्या घोषणांनी रॅलीचे वातावरण भारावून गेले होते. ही रॅली धामोते गावातील भूमिपूजन सोहळ्यापर्यंत काढण्यात आली.

भूमिपूजन समारंभास सरपंच महेश विरले, प्रकाश गायकवाड, गणेश बगाडे, विशाल कोंगडे, प्राची जाधव, विशाल वाघ, अशोक गायकवाड, उपसरपंच सविता कोळंबे, ग्रामसंघ अध्यक्ष जोत्स्ना विरले तसेच ग्रामपंचायत सदस्य आणि रोशन म्हसकर, पपेश विरले, सोमनाथ विरले, वैष्णवी म्हसकर, सविता कोळंबे, मेघ धुमाळ, संदीप शेलोरे, नूतन पेरणे, ओव्हाळ, गीता मोरे, अस्मिता विरले, साक्षी विरले, मयूर पेरणे, गणेश तावडे, मारुती विरले आदी उपस्थित होते.

सरपंच विरले यांनी बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा जागर, प्रसार प्रत्येक पिढीत व्हावा आणि त्या उद्देशाने हे स्मारक बनविले जात असून संविधान स्तंभ उभारणीमुळे संविधानातील तत्त्वे समाजासमोर जिवंत राहतील, असा आशावाद व्यक्त केला.

## मुरूडचे नगराध्यक्षपद ओबीसी महिलेसाठी आरक्षित; आज नगरसेवकपदाचे आरक्षण होणार जाहीर

**मुरुड : प्रतिनिधी**

मंत्रालयातून नुकतेच नगर परिषदेच्या थेट नगराध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर झाले असून मुरूडसाठी ओबीसी महिला आरक्षण मिळाले. त्यामुळे येथे नगराध्यक्षपदावर डोळा ठेवून असणाऱ्या पुरुष मंडळींच्या आशा धुळीस मिळाल्या आहेत.

नवाबकालीन काळात १८८८ साली मुरुड नगर परिषदेची स्थापना झालेली आहे. कोकणातील सर्वात जुनी नगर परिषद म्हणून या नगर परिषदेचा खास उल्लेख केला जातो. सन २०२१पासून मुरुड नगर परिषदेवर प्रशासक नेमणूक झाली होती. त्यामुळे चार वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर सार्वत्रिक निवडणूक लागल्याने सर्वच राजकीय पक्ष सक्रिय झाले होते.



विशेष करून पुरुष मंडळींमध्ये कमालीची उत्सुकता होती.

मागील नगर परिषद निवडणुकीमध्ये मुरूडचे नगराध्यक्षपद हे खुल्या वर्गातील महिलांसाठी होते. त्यामुळे यंदाच्या या निवडणुकीत पुरुषांसाठी संधी उपलब्ध होईल अशी अपेक्षा व्यक्त होत होती, मात्र आरक्षण जाहीर झाले ते ओबीसी महिला.

मुरुड नगर परिषद अंतर्गत मुरुड शहराची लोकसंख्या १२ हजार २१६ असून मतदार १० हजारांच्यावर आहेत. दहा प्रभागातून २० नगरसेवक निवडून येणार आहेत. मुरुड नगर परिषदेवर मागील वर्षी शिवसेनेचे एकतर्फी वर्चस्व होते. यंदाची ही निवडणूक चुरशीची होणार असून प्रत्येक राजकीय पक्ष आपले नशीब आजमावणार आहे.

कोण कोणाशी युती करणार ही गणिते लवकरच जोडली जाणार आहेत. चार वर्षांच्या प्रदीर्घ विश्रांतीनंतर लोकप्रतिनिधी निवडून येणार आहेत. थेट नगराध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर बुधवारी नगरसेवकपदाचे आरक्षण मुरुड नगर परिषद हॉल येथे जाहीर होणार आहे.

# उलवे नोडमध्ये कराटे चॅम्पियनशिप

## स्थानिक खेळाडूंचे वर्चस्व; अनेक पदके जिंकली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

युनिव्हर्स कराटे मार्शल आर्ट अकादमी इंडियाद्वारे भूमिपुत्र भवन उलवे नोड येथे आयोजित केलेल्या ऑल इंडिया ओपन कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, निहॉनसिकी कराटे ॲण्ड स्पोर्ट्स अकादमी आणि तिवरेकर सेल्फ डिफेन्स ॲण्ड स्पोर्ट्स अकादमीच्या विद्यार्थ्यांनी एकूण ५६ पदके जिंकली. एकूण ४८ विद्यार्थ्यांनी विविध वयोगट आणि वजन श्रेणींमध्ये काता, कुमिते प्रकारात १० सुवर्ण, १८ रौप्य आणि २८ कांस्यपदके पटकावली.



विद्यार्थ्यांना सरावासाठी उत्तम सोयीसुविधा आणि प्रोत्साहन देण्यात स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे मार्गदर्शक माजी खासदार रामशेठ ठाकूर आणि इतर कार्यवाहक यांचा मोलाचा वाटा आहे. क्योशि राकेश तिवरेकर आणि सेन्सई हरेश्वर तांबडकर यांनी प्रशिक्षण दिले.

स्पर्धेत सौनक सरीन प्रथम क्रमांक काता व द्वितीय क्रमांक कुमिते, वैभव मोरया, स्वस्तिक शर्मा, मनस्वी भोईटे प्रथम क्रमांक काता व तृतीय क्रमांक कुमिते, संजना गुप्ता, राजवीर राऊट्रे, आतिक्ष राजेश द्वितीय क्रमांक काता व द्वितीय क्रमांक कुमिते, देवाशिष शर्मा, हर्ष जैस्वाल द्वितीय क्रमांक काता व तृतीय क्रमांक कुमिते, मृदुला कलबुर्गी, रिया दुग्गल तृतीय क्रमांक काता व तृतीय क्रमांक कुमिते; काता प्रकारात युवा दहिया, आर्या पानसरे, मंत्रा गामी, तनुष ठक्कर, ओम पेडणेकर प्रथम क्रमांक; कविन कृष्ण, अमृत सिंह, स्वरा पिंगळे, आरव पवार, ह्रिया प्रभुणे, राज गुप्ता, क्रिश पारेख, तेजस कदम द्वितीय क्रमांक; भूमीराज पाटील, तन्वी पानसरे, समर्थ गोडसे, सांज नाईक, वैष्णवी कुमारी, तन्वी दहिया, जिविका पाटील, रिध्वा रोहित, रयांश जोएल, मानसी घाडीगावकर, नित्या जैस्वाल, लावण्य साटेलकर, तोशिवराज घोष, पियुषा पाटील, तनिषा पांडुकोनी, मोहम्मद इफराज शेख, प्रिनल भालेराव, छवी कुशवाह यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

या सर्व विद्यार्थ्यांनी केलेल्या चमकदार कामगिरीबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, चेअरमन परेश ठाकूर, जनरल सेक्रेटरी वाय.टी. देशमुख यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# सुधागड विद्यासंकुलच्या विद्यार्थ्यांचे ज्युडोमध्ये यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका जिल्हास्तरीय शालेय ज्युडो क्रीडा स्पर्धा नुकतीच खारघरमधील रामशेठ ठाकूर ज्युनियर कॉलेज येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत सुएसोच्या कळंबोली येथील विद्यासंकुलातील विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले.

इयत्ता आठवी चा विद्यार्थी स्वप्नील किशोर लावंड याने १४ वर्षाखालील ५० किलोवरील वजनी गटात सुवर्णपदक पटकाविले. याच प्रकारात अनिरुद्ध धनाजी बनगर याने रौप्यपदक मिळविले. स्वप्नीलची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



शाळेचे प्राचार्य राजेंद्र पालवे, पर्यवेक्षक पूनम कांबळे, रमेश अहेर, लक्ष्मण मगरे-पाटील, भगवान खेडकर, क्रीडा शिक्षक विलास पाटील, विकास नाईक, पियुष सदावर्ते, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## मल्लखांबपटू मनाली ठाकूरची आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ मुंबई संचालित महर्षी कर्वे महिला महाविद्यालय श्रीवर्धन येथील मनाली शैलेंद्र ठाकूर हिची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ मल्लखांब स्पर्धेत सलग तिसऱ्या वर्षी निवड झाली आहे.



मालाडमधील श्री भवानी आखाडा येथे झालेल्या निवड चाचणीत मनालीने उत्कृष्ट कामगिरी करून युनिव्हर्सिटीच्या अखिल भारतीय मल्लखांब संघात स्थान पटकावले आहे. ही स्पर्धा चेन्नई येथे होणार आहे. प्राचार्य, क्रीडा विभाग प्रमुख, शिक्षकांनी मनालीचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# कै. दीपक पाटकरच्या स्मरणार्थ बेंचप्रेस स्पर्धा; खेळाडूंचा प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हास्तरीय कै. कु. दीपक अरुण पाटकर याच्या स्मरणार्थ बेंचप्रेस स्पर्धा नुकतीच पनवेल येथील व्ही.के. हायस्कूलमध्ये झाली. ही स्पर्धा समस्त पाटकर कुटुंबियांनी पुरस्कृत केली होती.

या स्पर्धेत महाड, खोपोली, पेण, पनवेल, कर्जतमधील अनेक खेळाडूंनी भाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन दै. युवक आधारचे संपादक, अभिनेते संतोष आमले यांच्या हस्ते झाले. उद्घाटन समारंभास डॉ. कुमार शिंदे, महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंगचे जनरल सेक्रेटरी तथा शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त संजय सरदेसाई, खजिनदार सूर्यकांत गद्रे, माजी कबड्डीपटू दत्ता पाटकर, ज्येष्ठ योगा शिक्षक रामदास झोपे, रायगड पॉवरलिफ्टिंग संघटनेचे अध्यक्ष गिरीश वेदक, सदस्य सुभाष टेंबे, माधव पंडित, संदीप पाटकर, सहसचिव सचिन भालेराव आदी उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल दिनेश पवार, अमृता भगत, गायत्री बडेकर, नासिर सय्यद या खेळाडूंना या वेळी गौरविण्यात आले तसेच राष्ट्रीय गतिमंद स्पर्धेत पदक प्राप्त केल्याबद्दल जितेश साजेकरचा सत्कार झाला.



स्पर्धेत विविध गटांमध्ये १००पेक्षा अधिक मुले-मुली, पुरुष-महिला खेळाडू सहभागी झाले होते. पंच म्हणून मुंबईचे शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त अनंत चाळके, राष्ट्रीय पंच प्रशांत सरदेसाई, आंतरराष्ट्रीय पदक विजेते गोपीनाथ पवार, राष्ट्रीय पदक विजेता सुरेश धुळप, नवी मुंबईचे राकेश पाटील, राजेश शिर्के, मुंबई उपनगरचे विशाल मुळ्ये, उदय स्वामी यांनी भूमिका बजावली.

स्पर्धेतील विजेत्यांना दै. रामप्रहरचे वृत्तसंपादक समाधान पाटील, पॉवरलिफ्टिंगचे संजय सरदेसाई, माधव पंडित, माजी कबड्डीपटू दत्ता पाटकर आदींच्या हस्ते कै. दीपक पाटकर याच्या स्मरणार्थ पदक व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेला सामाजिक कार्यकर्ते प्रदीप घरत यांनी सदिच्छा भेट देऊन संघटनेस धन्यवाद दिले.

स्पर्धेत मदतनीस म्हणून मोरेश कारळे, अविनाश शेट्टी, ओम घोलतकर, शशिकांत वाघमारे, महेश वाघमारे, विवेक सांबरे, रोहन कांबळे, मयूर कोलकर आणि प्रांजल पाटेकर यांनी काम केले. स्पर्धेच्या व्यवस्थापनाची जबाबदारी कार्याध्यक्ष यशवंत मोकल यांच्या अनुभवी मार्गदर्शनाखाली संदीप पाटकर, तन्मय बारणे, संदीप पाटकर यांनी सांभाळली.

### असे आहेत विजेते

**पुरुष** : सब ज्युनिअर बेंचप्रेस स्ट्राँग बॉय जाहिद काणेकर (द क्वाडझिला फिटनेस महाड), ज्युनिअर बेंचप्रेस स्ट्राँग बॉय तन्मय पाटील (वैयक्तिक पेण), सीनियर बेंचप्रेस स्ट्राँग मॅन गणेश तोटे (फिटनेस ऑन जिम पनवेल), मास्टर्स बेंचप्रेस स्ट्राँग मॅन दिनेश पवार (स्पार्टन जिम खोपोली); **महिला** : सब ज्युनिअर बेंचप्रेस स्ट्राँग गर्ल गायत्री बडेकर (आयएनडी क्लब कर्जत), सिनियर बेंचप्रेस स्ट्राँग वूमन अमृता भगत (पॉवर हाऊस क्लब खोपोली), मास्टर बेंचप्रेस स्ट्राँग वूमन आशा घरत (हनुमान व्यायामशाळा पेण); सांघिक विजेतेपद : आयएनडी क्लब कर्जत, द क्वाडझिला फिटनेस महाड, फिटनेसऑन जिम तक्का पनवेल.

## अन्वय द्रविड कर्णधारपदी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) विनू मंकड करंडक स्पर्धेसाठी भारताचे माजी कर्णधार आणि प्रशिक्षक राहुल द्रविड यांचा धाकटा मुलगा अन्वय द्रविड याच्यावर मोठी जबाबदारी सोपविण्यात आली आहे. अन्वय या स्पर्धेत कर्नाटक संघाचे नेतृत्व करताना दिसणार आहे.

१६ वर्षीय अन्वयने मागील वर्षी याच स्पर्धेत कर्नाटक राज्यासाठी सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम केला होता. या वेळीही तो संघाच्या आघाडीच्या फळीत महत्त्वाची भूमिका पार पाडेल. बीसीसीआयची ही स्पर्धा ९ ते १७ ऑक्टोबरदरम्यान देहरादून येथे खेळली जाणार आहे. या स्पर्धेत खेळाडू तसेच कर्णधार म्हणून अन्वय द्रविड भूमिका बजावताना पहावयास मिळणार आहे.

## वुशू स्पर्धेत 'सीकेटी'च्या रोहन वाजेची राज्यस्तरीय निवड



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय आणि मुंबई उपनगर यांच्या संयुक्त विद्यमाने बीएमसी स्कूल कांदिवली येथे झालेल्या १७ वर्षांखालील मुले व मुली वुशू स्पर्धेत नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील रोहन सुरेश वाजे (अकरावी सायन्स) याने प्रथम क्रमांक प्राप्त केला. या विद्यार्थ्यांची छत्रपती संभाजीनगर विभागीय क्रीडासंकुल गारखेडा येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

वुशू स्पर्धेतील रोहनने केलेल्या चमकदार कामगिरीबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



## उत्तम मानेंची 'सुवर्ण' हॅट्ट्रिक

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा येथील जेष्ठ नागरिक संघाचे सभासद उत्तम माने यांनी पालघर जिल्हा आयोजित खेलो इंडिया मास्टर्स राज्यस्तरीय ॲथलेटिक स्पर्धेत सुवर्णपदकांची कमाई केली.

मुंबई विद्यापीठ मैदान मरीन लाइन्स येथे ही स्पर्धा झाली. या स्पर्धेत उत्तम माने यांनी थाळीफेक, लांब उडी आणि गोळाफेकमध्ये सुवर्णपदक जिंकली. त्यांचे अभिनंदन होत आहे. माने हे यंदापासून ७०+ वयोगटातील स्पर्धेत खेळत आहेत. त्यांनी आजपर्यंत ५० सुवर्ण, ५४ रौप्य आणि ३१ कांस्य अशी एकूण १३५ पदके जिंकली आहेत.

## बॉक्सिंग स्पर्धेत वैदेही जाधवला 'कांस्य'



**रोहा : प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड येथे झालेल्या राज्यस्तरीय मिक्स बॉक्सिंग स्पर्धेत गोवे गावची वैदेही संदीप जाधव ही कांस्यपदकाची मानकरी ठरली. तिची ओडिशा येथे राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या मिक्स बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

राज्यस्तरीय स्पर्धेत सह्याद्री मार्शल आर्ट्स असोसिएशन रायगड जिल्हा संघाने एकूण १० पदकांची कमाई केली. यामध्ये आरूष निशिकांत सानप, स्वरूप सागर शिर्के, मनस्वी मंगेश खांडेकर यांनी सुवर्ण; सात्विक उमेश बिरगावले, अनुप चंद्रकांत नाकते, क्षितिज श्रीधर गावडे, आदित्य महिंद्र लोखंडे यांनी रौप्य; तर वैदेही संदीप जाधव, जुई देवेंद्र मोरे, सारस महेंद्र दहिंबेकर यांनी कांस्यपदक पटकावले. या सर्व खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यशस्वी खेळाडू, प्रशिक्षक व मार्गदर्शकांचे अभिनंदन होत असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छाही देण्यात आल्या.

# साची बेलोसे रायगडची पहिली महिला स्टेट पॅनल पंच

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील खारघर येथील महिला क्रिकेटपटू साची सुधीर बेलोसे ही महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए) च्या वतीने आयोजित स्टेट पॅनल पंच परीक्षा उत्तीर्ण झाली. यासह रायगडच्या क्रिकेट इतिहासातली पहिली महिला कसोटी पंच होण्याचा मान साक्षीने मिळवला आहे.



साचीला एमसीए स्टेट पॅनेल पंच परीक्षेत ८२ टक्के गुण मिळाले आहेत. प्रॅक्टिकल परीक्षेत तिला २० पैकी २० गुण मिळाले असून तिने प्रॅक्टिकलमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. सोमवारी (दि. ६) एमसीएच्या वतीने स्टेट पॅनल पंच परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. संपूर्ण कोकण विभागातून साचीने ही एकमेव महिला पंच म्हणून स्टेट पॅनल पंच परीक्षा उत्तीर्ण केली आहे.

साची एक उत्तम क्रिकेट खेळाडू असून तिने रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)च्या १५, १९, २३ वर्षांखालील तसेच वरिष्ठ महिलांच्या संघाचे प्रतिनिधित्व केले आहे. साचीशी संवाद साधला असता तिने पंच परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे. एमसीएच्या वतीने महिलांसाठी स्टेट पॅनल पंच परीक्षेचे आयोजन करून महाराष्ट्रातील महिलांना क्रिकेट क्षेत्रात पंच होण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल तिने एमसीएचे आभार मानले तसेच आरडीसीएच्या वतीने जिल्ह्यातील पंचांसाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करून जिल्ह्यातील पंचांना उत्तम दर्जाचे मार्गदर्शन मिळाले असल्याचे सांगितले. आरडीसीएच्या वतीने जिल्ह्यातील क्रिकेट पंचांसाठी १०० दिवसांच्या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी घेतलेल्या पुढाकाराचे हे फलित असल्याचेही साची म्हणाली.

आरडीसीएचे मार्गदर्शक व क्रिकेट नियमांचे तज्ञ नयन कट्टा, बीसीसीआय पंच व माजी रणजी ट्रॉफी खेळाडू हर्षद रावले, एमसीए (मुंबई) पंच राजन कसबे यांनी जिल्ह्यातील पंचाना बहुमूल्य मार्गदर्शन केले आहे. आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, उपाध्यक्ष यशवंत साबळे, राजेश पाटील, संतोष भोईर, सचिव प्रदीप नाईक, सहसचिव जयंत नाईक, बशीर चिचकर, कोषाध्यक्ष प्रशांत ओक, कार्यकारिणी समिती सदस्य ॲड.पंकज पंडित, समीर मसुरकर, प्रदीप खलाटे, कौस्तुभ जोशी, मुख्य प्रशिक्षक शंकर दळवी यांनी साची बेलोसे हिचे अभिनंदन केले.

आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, गेल्या एक वर्षाच्या कालावधीत जिल्ह्यातील १२ पंचांनी एमसीए पंच पॅनेलसाठी पात्रता मिळवली असून ११ अधिकृत एमसीए स्टेट पॅनेल स्कोअरर्स कार्यरत आहेत. ही आरडीसीएची मोठी कामगिरी म्हणावी लागेल. रायगड जिल्ह्यात क्रिकेट खेळाचा दर्जा वाढवण्यासाठी चांगल्या दर्जाचे पंच व स्कोअरर्स तयार करणे गरजेचे असून त्यासाठी आरडीसीए सातत्याने परिश्रम घेत आहे. जिल्ह्यातील विविध वयोगटातील मुला-मुलींची निवड महाराष्ट्राच्या संघात होत असून पुरुषांबरोबर महिला पंच व स्कोअरर्सदेखील एमसीएमध्ये कार्यरत होत असल्याचा आनंद असल्याचे पाटील यांनी सांगितले. दरम्यान, साचीने एमसीए स्टेट पॅनल पंच परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल तिचे कौतुक होत आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com